सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ०३ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# शेतीच्या पायाभूत सुविधांसाठी केंद्राकडून १४ हजार कोटी मंजूर!

## डिजिटल प्रकल्पांसाठी २०,८१७ कोटींच्या गुंतवणुकीसह डिजिटल कृषी मिशनची स्थापना करणार

नवी दिल्ली : देशात कृषीविषयक धोरण राबवण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्वपूर्ण निर्णय घेण्यात येत आहेत. शेतीच्या पायाभूत सुविधांसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाकडून सात महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून कृषी संबंधित उपक्रमांना चालना देण्यासाठी एकूण १३ हजार ९६६ कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. यामध्ये डिजिटल कृषी मोहिम, अन्न व पोषण सुरक्षा, पशुधन, फलोत्पादन, शिक्षण व्यवस्थापनाच्या विकासाला चालना देण्यासाठी निधीला मंजूरी देण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. दिल्लीत ते माध्यमांशी बोलत होते.



मंत्री वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सात मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. सर्वात आधी डिजिटल कृषी मोहिम असून याच धर्तीवर विकसित केले जाणार आहेत. शेतीसाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर करण्यासाठी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. डिजिटल प्रकल्पांसाठी एकूण २० हजार ८१७ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह डिजिटल कृषी मिशनची स्थापना करण्यात येणार असल्याचे वैष्णव यांनी स्पष्ट केले.

### मंत्रिमंडळातील महत्वपूर्ण निर्णय

डिजिटल कृषी मोहिमेसाठी २,८१७ कोटी रुपयांची मंजुरी
अन्न, पोषण सुरक्षेसाठी ३,९७९ कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी
कृषी शिक्षण, व्यवस्थापन योजनेसाठी २,२९१ कोटी रुपयांची मंजुरी
फलोत्पादन योजनेसाठी ८६० कोटी रुपये मंजूर
पशुधन आरोग्य व्यवस्थापन योजनेसाठी ७१,७०२ कोटी रुपये मंजूर
कृषी विज्ञान केंद्राच्या विकासासाठी १,२०२ कोटी रुपये मंजूर
नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन योजनेसाठी १,११५ कोटी रुपये मंजूर

# 'आप'च्या अमानतुल्ला खानकडे ईडीची धाड

## मनी लाँड्रिंग प्रकरणी चौकशीनंतर घेतले ताब्यात



नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे आमदार अमानतुल्ला खान यांच्याकडे आज, सोमवारी सकाळी ईडीची धाड पडली. तब्बल ४ तास चाललेल्या सर्च ऑपरेशननंतर ईडीने अमानतुल्ला यांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान, अमानतुल्ला यांनी हुकूमशाहच्या इशाऱ्यावर ईडीचे लोक मला अटक करण्यासाठी माझ्या घरी आले आहेत., अशी पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली होती.

अमानतुल्ला खान हे २०१८ ते २०२२ दरम्यान दिल्ली वक्फ बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या काळात बेकायदेशीररीत्या कर्मचाऱ्यांची भरती आणि वक्फ बोर्डाच्या मालमत्ता चुकीच्या पद्धतीने भाड्याने दिल्याच्या आरोपांची ईडी चौकशी करत आहेत. या प्रकरणी खान यांची १२ तासांहून अधिक चौकशी केली आहे. खान यांनी बेकायदेशीर कृत्यांमधून मोठी रक्कम मिळवली. यातून त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या नावे स्थावर मालमत्ता खरेदी केली, असाही त्यांच्यावर आरोप आहे.

# पुण्यात फायनान्स कंपनीच्या मॅनेजरचा निर्घृण खून

पुणे - पुण्यातील हडपसर भागात मध्यरात्री एका फायनान्स कंपनीच्या मॅनेजरचा निर्घृण खून करण्यात आला आहे. वासुदेव कुलकर्णी असे खून झालेल्या मॅनेजरचे नाव असून, ते शतपावली करत असताना त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने हल्ला केला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या घटनेच्या काही तासांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. त्यामुळे पुण्यात १२ तासांत दोन खुनांच्या घटनांनी खळबळ उडाली आहे.गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली आहे. काल रात्री राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचा नाना पेठेतील त्यांच्या कार्यालयाजवळ पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. या घटनेचा ताजाच धक्का सावरला नसताना, हडपसर भागात रात्री फायनान्स कंपनीच्या मॅनेजरचा खून झाल्यामुळे

# पंतप्रधानांनी शिवाजी महाराजांच्या विचारांची केलेली तुलना चुकीची - शरद पवार

मुंबई : शिवाजी महाराजांच्या विचारांची मोदींनी केलेली तुलना चुकीची असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि रयतेच्या राज्याचा विचार मांडला. या विचारांची तुलना पंतप्रधान मोदींनी कशा पद्धतीने केली



आणि माफी मागितल्याचा संदेश दिला जातो, हे चुकीच्या विचारांना प्रोत्साहन देणे आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना पवारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या घटनेचा संदर्भ घेत मोदींवर निशाणा साधला.

शिवाजी महाराजांचा पुतळा पडला. लोकांच्यात अस्वस्थता आहे. विषय काय आहे आणि सावरकरांचा मुद्दा त्यांनी मांडला. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सावरकर अनेक वर्ष तुरुंगात गेले. हा त्याग त्यांनी केला, हे आपण मान्य करू. हिंदवी स्वराज्याची स्थापना ज्यांनी केली, रयतेचं राज्य स्थापन करण्याचा विचार ज्यांनी मांडला, ते शिवाजी माहाराजांची तुलना देशाचे पंतप्रधान कशा पद्धतीने करतात आणि माफी मागितली असा संदेश पसरवला जातोय. याचा अर्थ असा की, तुम्ही चुकीच्या गोष्टी, चुकीच्या विचारांना प्रोत्साहित करता. ते अंगाशी आलं की माफी मागता, असेही पवार म्हणाले. मालवणच्या राजकोटमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याची घटना घडली होती, त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता पसरली होती. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर माफी मागितली होती.

# कन्नड तालुक्यात मुसळधार, गावात शिरले पाणी

## काही ठिकाणी मका कापूस पिके भुईसपाट

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि .२. सप्टेंबर- कन्नड तालुक्यात सर्वत्र मुसळधार पावसाने हजेरी लावली असून सतत धारा पावसामुळे नदी नाले ओढे दुथडी भरून वाहत आहे. नदीला महापुराचे स्वरूप निर्माण झाले असून यामुळे अनेक ठिकाणी गावांचा संपर्क तुटला असून काही ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे . दिगाव खेडी ,वाकद, नाचनवेल, या परिसरातील नदी नाल्यांना मोठा पूर आला असून नदीचे पाणी गावात शिरण्यात सुरुवात होत आहे. त्यामुळे नागरिकांनी नदी नाले तलाव यांच्या जवळ जाऊनही व सावध राहावे असे देखील नागरिक



गावकरी सावध राहण्यास सांगत आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे मक्काचे पिक भुईसपाट झाले असून मोठे नुकसान देखील शेतकऱ्यांचे झाले यावर्षी मोठ्या प्रमाणावर अद्रकीचे लागवड असल्याने अद्रकीचे पीक देखील संकटात आहे यामुळे कही खुशी कही गम अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच नदी ,नाले तलाव तहानलेले होते कोरडे ठक पडलेले होते त्यामुळे यावर्षी देखील पाण्याची मोठी समस्या निर्माण होत असल्याचे परिस्थिती शेतकऱ्यांना जाणवत होती मात्र आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या सुटली असून यामुळे विहीर तसेच जमिनीच्या पाणी पातळीत वाढ होण्यास सुरुवात झाली असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण देखील आहे .

मागील वर्षीप्रमाणे याही वर्षी पोळा सणाच्या दिवशी बैल धुण्यासाठी पाण्याची टंचाई राहिल असे वाटत होते मात्र वरून राजाची कृपा झाल्याने शेतकरी आनंद व्यक्त करीत आहे. अंजना नदीवरील नाचनवेल कोपरवेल या दोन गावांना जोडणारा नवीन पूल झाल्यामुळे दोन्ही गावांची मुख्य होणारी दरवर्षीची समस्या मार्गी लागली आहे यामुळे मोठी अडचण शेतकरी व नागरिकांमध्ये होत होती मात्र नवीन पुलाचे काम झाल्याने दोन्ही गावातील नागरिक व ग्रामस्थ समाधान आनंद व्यक्त करत असून प्रशासनाचे आभार व्यक्त करीत आहे.

# सोयगाव तालुक्यात मुसळधार; सोना नदीचे पूराचे पाणी शिरून दोन घरे कोसळले; घरांत पाणी शिरले

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ सप्टेंबर

सोयगाव शहरासह तालुक्यात रविवारी रात्री आणि सोमवारी सकाळी दहा वाजेपर्यंत झालेल्या संततधार मुसळधार पावसाने शहरातील सोना नदीने धोक्याची पातळी ओलांडून शहरातील जुना बाजार चौक परिसरातील नदी काठच्या घरात पुराचे पाणी शिरले. तर यामध्ये दोन घरे कोसळे घटना शहरात घडली.

शहराच्या सोना नदीच्या पुराच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडून शहरातील जुना बाजार चौक भागातील घरात पुराचे पाणी शिरले होते तर दोन घरे कोसळले आहे नदीच्या काठावर असलेल्या कौशल्याबाई मधुकर गव्हांडे व



### पकेही पाण्यात

सोयगाव सह तालुक्यातील गलवाडा,जरंडी, निंबायती,कवली बहुलखेडा उमर विहिरे घोसला या शिवारातील पिकांना पुराच्या पाण्यामुळे जलसमाधी मिळाली असून कपाशी मका सोयाबीन आदी पिकांची नुकसान झाले आहे दरम्यान गलवाडा वेताळवाडी शिवारात पुराचे पाणी शेतात शिरून गट न.६२ गोपाल सदाशिव इंगळे,गायत्री गोपाल इंगळे,मंजुळाबाई सदाशिव इंगळे, धुपताबाई कोळी आदींचे कपाशी पिके वाहून गेली आहे तर पीटर मशीन वाहून गेले.

रवींद्र परेराव यांची घरे पूराच्या पाण्यात वाहून गेली असून एका घराची भिंत कोसळून कोकिळाबाई संजय बागुल (वय ४०) मोहीत गणेश सपकाळे(वय ४ ) हे दोन्ही गंभीर जखमी झाले आहे दरम्यान सोना नदीच्या पूरने रौद्ररूप धारण केले होते त्यामुळे शहरात खळबळ उडाली होती गलवाडा गावाजवळ हळदा ता.सिल्लोड कडे जाणारी ओमीनी गाडी रुद्रेश्वर नाल्याच्या पुरात वाहून गेली असून वाहनचालक गणेश तुळशीराम घुगरे(वय.३०) रा.गलवाडा यांनी गाडी वाहून जात असल्याचे लक्षात येताच उडी मारून पुराच्या पाण्यातून पोहून किनारा गाठला मात्र त्यांची ओमीनी गाडी क्र- एम.एच.०३ ए.आर.२३१२ ही पूरात वाहून गेली त्यामुळे त्यांचे दोन लाख रु नुकसान झाले आहे.

# देशभरातील बुलडोजर कारवाईवर सर्वोच्च न्यायालय नाराज

नवी दिल्ली, ०२ सप्टेंबर : एकादा दोषी आढळला तरी त्याचे घर पाडणे योग्य नसल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या विविध राज्यांमधील बुलडोजर कारवाईवर नाराजी व्यक्त केली आहे. जमियत उलेमा-ए-हिंदच्या याचिकेवर सुनावणी करताना न्या. भूषण गवई आणि न्या.केव्ही विश्वानाथन यांच्या खंडपीठाने ही नाराजी व्यक्त केलीय.

जमियत उलेमा-ए-हिंदने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत दोषींच्या घरावर मनमर्जीप्रमाणे बुलडोझर चालवण्याच्या कारवाईला मनाई करा अशी मागणी केली होती. याचिका यूपी, मध्य प्रदेश, राजस्थानात बुलडोझर कारवाईचा उल्लेख करत अल्पसंख्याकांना टार्गेट केले जात आहे असाही आरोप केला होता. याप्रकरणी न्या. भूषण गवई आणि न्या.केव्ही विश्वानाथन यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. केवळ दोषी असल्याच्या आधारे कुणाचंही घर पाडणे योग्य नाही. जर कुणी दोषी असेल तर त्याचे घर पाडले जाऊ शकत नाही असे सांगत सुप्रीम कोर्टाने बुलडोझर कारवाईवर प्रश्न उपस्थित केलेत. त्यावर महाधिवक्ता तुषार मेहतांनी कोर्टाचे आदेश मान्य केले. त्याशिवाय बुलडोझर कारवाई अवैध बांधकाम बांधल्याप्रकरणी केली आहे. आरोपी दोषी आहेत त्यामुळे नसल्याचे मेहता यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच जी काही कारवाई केली ती महापालिका कायद्याद्वारे केली. अवैध बांधकामांना महापालिकेकडून नोटीस दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. यावर न्या. विश्वनाथन यांनी सरकारकडून सविस्तर उत्तर मागवले आहे. कोर्टाने नोटीस, कारवाई आणि अन्य आरोपांवर म्हणणे मांडण्याचे आदेश सरकारला दिले आहेत.

# गणेश मंडळांना आता घर बसल्या मिळणार परवानगी - आयुक्त यशवंत डांगे

नगर : गणेशउत्सव जवळ आला की भक्तांच्या आनंदोत्सवात भर पडत असते, मित्र मंडळ मंडळांची परवानगी घेण्यासाठी धावपळ सुरू होत असते, ऑफलाईन अर्ज भरण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार, सदस्य यांना विविध कार्यालयात परवानगीसाठी जावे लागते आणि त्यामध्ये वेळ वाया जातो या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ऑनलाइनचा वापर करत मंडळांना अधिक सोयीचे व्हावे यासाठी एका क्लिकवर परवानगी मिळणार आहे तरी महापालिका हद्दीतील मंडळांनी ऑनलाइन अर्ज भरून आपल्या कागदपत्राची



पूर्तता करावी, त्याला घरबसल्या परवानगी मिळणार असल्याची माहिती महापालिकेच्या आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

अहमदनगर महापालिकेच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त मंडळांसाठी व्यवस्थापन प्रणालीचा शुभारंभ आयुक्त यशवंत डांगे

**गणेश उत्सवाच्या काळामध्ये मंडळांना नगररचना, वाहतूक पोलीस शाखा, एम एस सी बी, पोलीस विभाग, महापालिका अतिक्रमण विभाग आदींची परवानगी तातडीने मिळावी त्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअर निर्माण केले त्यावर मंडळांनी अर्ज भरून द्यावा त्यांना एका क्लिकमध्ये घरबसल्या मंजुरी मिळणार आहे, शहरांमध्ये १२८ मित्र मंडळ असून यापैकी २४ मंडळांनी या ऑनलाइन वेबसाईटवर अर्ज दाखल केला आहे, तरी सर्वांनी या योजनेचा लाभ घ्यावा आणि मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात पारंपरिक पद्धतीने गणेश उत्सव साजरा करावा असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले**

यांच्या हस्ते संपन्न झाला, यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, उपायुक्त सपना वसावा, सहाय्यक आयुक्त प्रियंका शिंदे, सहाय्यक आयुक्त निखिल फराटे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, मुख्यलेखा अधिकारी डॉ. सचिन धस, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, नाना गोसावी, राकेश कोतकर, संगणक प्रमुख अंबादास साळी, इंजिनीयर गणेश गाडळकर आदी उपस्थित होते

# जम्मू-काश्मीरच्या सैन्य तळावर दहशतवादी हल्ला

जम्मू, ०२ सप्टेंबर : जम्मू-काश्मिरातील सुंजवा सैन्य तळावर आज, सोमवारी सकाळी ११ वाजता जिहादी दहशतवाद्यांनी हल्ला चढवला. यात सैन्याचा एक जवान जखमी झाला आहे. या हल्ल्याला लष्कराकडून सडेतोड प्रत्युत्तर देण्यात आले. तसेच या हल्ल्यानंतर सैन्याने या संपूर्ण परिसराला वेढा घालून सर्च ऑपरेशन सुरू केलेय.

गेल्या काही दिवसांपासून जिहादी दहशतवाद्यांनी काश्मीर खोऱ्यासाबोतच जम्मू परिसरातही आपल्या कारवाया वाढवल्या आहेत. जम्मूच्या सुंजवा सैन्य तळावर ३६ इन्फंट्री ब्रिगेड तैनात आहे. दहशतवाद्यांनी सोमवारी सकाळी ११ वाजता अचानक या ठिकाणी हल्ला चढवला. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला लष्कराच्या जवानांनीही प्रत्युत्तर म्हणून गोळीबार केला. दहशतवाद्यांनी तळाजवळ तैनात असलेल्या लष्कराच्या जवानावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात जवान जखमी झाला, अशी माहिती संरक्षण विभागाच्या सूत्रांनी सांगितली. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी लष्कराने स्थानिक पोलिसांसह शोध मोहीम सुरू आहे. याआधी गुरुवारी, लष्कराने जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यातील मच्छल आणि तंगधर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न करणाऱ्या ३ दहशतवाद्यांचा यशस्वीपणे खात्मा केला होता.

# महापालिकेत कर्मचाऱ्यांचे निदर्शने ; कर्मचाऱ्यांनी साफसफाई व आरोग्य सुविधा ठेवली बंद

## सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय माघार घेणार नाही


नगर : अहमदनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी महापालिका कर्मचारी युनियनच्या वतीने उपोषण सुरू केले असून आज आठव्या दिवशी उपोषण करते बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब राशिनकर यांची तब्येत खालावली असून कर्मचाऱ्यांनी महापालिकेत निदर्शने केली, यावेळी साफसफाई व आरोग्य



सुविधाचे काम बंद ठेवण्यात आले होते, शासनाने अजून पर्यंत निर्णय घेतला नाही त्यामुळे चिंतेचा विषय बनला आहे, आज संध्याकाळपर्यंत निर्णय झाला नाही तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केले जाईल, उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली असून गंभीर बनत चालले आहे, आम्ही लोकशाही मार्गाने आमचा हक्क मागत आहोत, या आंदोलनामध्ये काही अनुचित घटना घडली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची असेल , आता आम्ही सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय माघार घेणार नाही असा इशारा सचिव आनंद वायकर आणि अनंत लोखंडे यांनी दिला. यावेळी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते




# रक्षाबंधनसाठी आलेली विवाहित महिला बेपत्ता!



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ सप्टेंबर - शहरातील इंद्रलोक नगरी म्हाडा परिसरातून विवाहित महिला बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे

रक्षाबंधनासाठी माहेरी आलेली विवाहित महिला पूजा सुनील मोरे वय २२ वर्षे ही चार दिवसांपासून बेपत्ता झाली आहे,तिच्या घरच्यांनी नातेवाईक,परिसरात शोधा शोध केली परंतु पूजा आढळून न आल्याने कन्नड शहर पोलिसांत धाव घेतली अल्काबाई गायकवाड रा.इंद्रलोक नगरी यांच्या फिर्यादी वरून बेपत्ता असल्याची नोंद शहर पोलिसांनी केली आहे,

विवाहित महिलेचे वर्णन अंगात जांभळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस,केस काळे,५.२ फूट उंची,कानात झुंबके, डाव्या हातावर गोंधलेले, उजव्या हातावर चटका बसल्याची खूण, पायात आकाशी रंगाची सँडल अशा वर्णनाची महिला आढळून आल्यास कन्नड शहर पोलिसांना ०२४३५-२२१०४४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन पोलिस नाईक मोईस बेग यांनी केले आहे

## महिलांना सशक्त करण्यासाठी कार्यक्रम

अहमदनगर : फ्लिपकार्ट समर्थने आपल्या ५ वर्षांच्या प्रवासाचा टप्पा साजरा करण्यासाठी भारतातील कारागीर, विणकर, अल्पबचत गट महिला आणि ग्रामीण उद्योजकांना आणखी सशक्त करण्यासाठी एका कार्यक्रमाचं आयोजन केलं. या कार्यक्रमाला उद्योग क्षेत्रातील २५० दिग्गज, विक्रेते, कारागीर, विणकर, हस्तकला कामगार आणि अल्प बचत गटातील लोक उपस्थित होते. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा उत्सव साजरा करणं आणि त्याला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव अतुल कुमार तिवारी. संयुक्त सचिव सोनल मिश्रा यांचा समावेश होता.

## युनियन बँक ऑफ इंडिया सोबत भागीदारी केली

औरंगाबाद: नाविन्यपूर्ण उपायांद्वारे ग्राहकांचा अनुभव वाढविण्याच्या आणि कार मालकीचा अनुभव सुलभ करण्याच्या सतत प्रयत्नात, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज युनियन बँक ऑफ इंडिया सोबत सर्वसमावेशक आणि सुलभ वाहन वित्तपुरवठा उपाय सक्षम करण्यासाठी सामंजस्य करारावर वर स्वाक्षरी केल्याची घोषणा केली. ग्राहकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि टोयोटाच्या वाहनांना नेहमीपेक्षा अधिक सुलभ बनवण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि आकर्षक उपाय ऑफर करणे हे या भागीदारीचे उद्दिष्ट आहे.श्री. साबरी मनोहर, वाइस प्रेसिडेंट, सेल्स-सर्व्हिस-युज्ड कार, टोयोटा किर्लोस्कर मोटर नवीन ग्राहक उपक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, संपूर्ण देशभरात वाहन वित्तपुरवठा पर्यायांचा विस्तार करण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडियासोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. हे सहकार्य वाहन वित्तपुरवठा सोपा आणि अधिक सुलभ बनवून चांगला ग्राहक अनुभव प्रदान करण्याची आमची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. वित्तपुरवठा पर्याय सुव्यवस्थित करणे, चांगला अनुभव देणे आणि वाहन खरेदी प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी वेळेवर मदत करणे हे आमचे ध्येय आहे.

## महाराष्ट्रात १०९ महिलांवर अत्याचाराच्या घटना

मुंबई - राज्यातून सर्वत्र महिला अत्याचाराच्या घटनांना मोठे पेव फुटले असताना एकूणच जनमानस संतप्त आहे. या पार्श्वभूमीवर नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) आकडेवारीचा अभ्यास केला तर महाविकास आघाडी आणि महायुतीच्या काळातील दैनंदिन - सरासरी घटनांची संख्या १२६ इतकीच असल्याचे लक्षात येते. २०२१ या कोविडच्या लॉकडाऊन काळात सुद्धा महाराष्ट्रात प्रतिदिवशी १०९ महिला अत्याचाराच्या घटना घडत होत्या. विशेष म्हणजे जानेवारी ते जून २०२२ या काळात ज्या सरासरी १२६ घटना प्रतिदिवशी घडत होत्या, तितक्याच घटना म्हणजे प्रतिदिन १२६ इतकीच संख्या आजही आहे.

## घाटनांद्रा घाटात दरड कोसळून रस्ता बंद झाल्याने सिल्लोडकडे जाणारी वहातूक ठप्प



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ सप्टेंबर

पाचोरा -छत्रपती संभाजीनगर राज्य रस्त्यावरील घाटनांद्रा घाटात बोरमाळ तांडा गावाजवळ सोमवारी (दि. २) झालेल्या मुसळधार पावसामुळे दरड कोसळून रस्ता बंद झाल्याने सिल्लोड कडे जाणारी वहातूक पाच तास ठप्प झाली होती

अजिंठा डोंगररांगेतील बनोटी परिसरात रविवारी रात्री आणि सोमवारी सकाळी अतिवृष्टी झाल्याने घाटनांद्रा घाटातील दुर्सय़ा वळण रस्त्यावर दरड कोसळून दगड मातीचा ढीगारा जमा झाल्याने रस्त्याच्या दुतर्फा वहातूक ठप्प पडल्याने वहानांच्या एक किलोमीटरवर रांगा लागुन प्रवाशाचे हाल झाले भर मुसळधार पावसात घाटात कशाचीही सुविधा नसतांना प्रवाशी,वाहनधारकांचे हाल झाले.दरळ कोसळुन दगड मातीचा ढीगारा जमा झाल्याची वार्ता बोरमाळ तांडा तेथील ग्रामस्थांनी दिल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने तिडका येथील युवकांनी तसेच बोरमाळ तांडा येथील युवकांनी भरपावसात जेसीबी सहाय्याने दगळ मातीचा ढीगारा बाजुला करीत तीन तासाच्या अथक परिश्रमाने वहातूक सुरळीत केल्याने बैल पोळ्यांसाठी घराकडे जाणार्या प्रवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला.

## पालकमंत्र्यांनी केली अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी; पंचनामे करण्याचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.२ (जिमाका)- जिल्ह्यात गेल्या २४ तासांहून अधिक कालावधीसाठी संततधार पाऊस सुरु असून अतिवृष्टिमुळे शेतीत पाणी साचणे, नद्या नाल्यांना पूर येणे यांच्या सह काही ठिकाणी नुकसानी झाल्याचे वृत्त आहे. यासंदर्भात आज सकाळी राज्याचे पणन,अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी पालगाव, पिंपळगाव ता. फुलंब्री या शिवारांमध्ये पाहणी केली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, प्रांताधिकारी निलम बाफना तसेच पालगाव सरपंच जया जाधव तसेच स्थानिक नागरिक व शेतकरी उपस्थित होते. पालकमंत्री अब्दूल सत्तार यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.


### टिसी हरवली आहे

नवनाथ वैजिनाथ कानडे याची बसवंतराव पाटील माध्यमिक इंग्रजी शाळा रांजणगाव शे. पू. ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या शाळेची १० वी पासची टिसी गहाळ झाली आहे . सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा मो. नं. ७६२०१८७७५५


# सन्मान यशवंताचा ! मनोज पवार यांचा स्तुत्य उपक्रम




तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ सप्टेंबर - तालुक्यातील यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सन्मान सोहळा सामाजिक कार्यकर्ते मनोज पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी उर्मिला पवार यांनी स्तुत्य उपक्रम दि.०१ रविवार रोजी आयोजित केला होता

स्पर्धा परीक्षेत,पोलिस भरती,सैन्य भरती यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसह पालकांचा सन्मान करण्यात आला,यावेळी समाजसेवक मनोज पवार म्हणाले की,तालुक्यातुन अधिकाअधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी,शासकीय सेवेत तालुक्यातील विद्यार्थी असावेत यासाठी आपण हा कार्यक्रम आयोजित केला असे ते म्हणाले,भविष्यात या विद्यार्थ्यांना बघून येणाऱ्या पीडित चैतन्य, आत्मविश्वास वाढेल असेही ते म्हणाले या कार्यक्रमासाठी नोबेल पब्लिकेशन के.के.भुतेकर, प्रसिध्द व्याख्याते आदर्श शिक्षक प्रा.डॉ. संजय गायकवाड, .प्रा. रंगनाथ लहाणे , भगवान ठाकरे , साई इम्पॅक्ट करिअर अकॅडमी किसन काकरवाल , जालिंदर गायके यांची उपस्थिती होती यावेळी उपस्थितांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अमृता पुणे, फरीन शेख, समिक्षा बनसोडे,मनिषा जंगले,कावेरी वेताळ, कल्याणी चव्हाण, तेजस्विनी गायके, ज्ञानेश्वर जाधव, सुरेश पवार, राजेंद्र पवार, अनिल ढेपले, विश्वजीत गौर, मकसुद पठाण, आकाश कटके, विशाल सोनवणे या विद्यार्थ्यांसह पालकांचा सन्मान करण्यात आला यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित होते कार्यक्रमाचा शेवट हा स्नेहभोजनाने झाला,सूत्रसंचालन व आभार प्रवीण दाभाडे यांनी केले

# अखेर खुल्या जागेवर झाला सिमेंट कॉंक्रिट रस्ता ! नागरिकांच्या पाठपुराव्याला यश



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील हिवरखेडा रोडवरील नवनजीवन वसाहतीत राहणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी नगरपालिकेच्या खुल्या जागेवरून रस्त्या मिळावा या मागणीसाठी माजी नगरसेविका विद्या काशीनंद व नागरिकांच्या पाठपुराव्याला यश आले आहे

शहरातील मुख्य रस्ता असलेल्या हिवरखेडा रोड लगत असलेल्या नवजीवन वसाहतीला ये-जा करण्यासाठी अरुंद रस्ता असल्याने मोठी तारांबळ होत असल्याने नागरिकांनी याबाबत मुख्यधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता,या पाठपुराव्याला अखेर यश आले असून मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०१ रोजी सहा मीटरचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनवण्यात आला आहे, या परिसरातील नागरिकांना हिवरखेडा रोडला जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे दि.३१ रोजी सायंकाळी नागरिकांनी माजी नगरसेविका विद्या काशीनंद व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण (बंटी) काशीनंद या दापत्यांचा सन्मान केला,

# शिवसेनेतर्फे विद्यार्थ्यांना छत्री वाटप



तभा दि. २ (प्रतिनिधी) : वाळूज महानगर: संभाजीनगर पश्चिम मतदारसंघात शिवसेना तालुकाप्रमुख शबाळासाहेब गायकवाड यांच्या मार्फत विद्यार्थी तसेच गरजवंत छोटे उद्योजक हातगाडी चालकांना छत्री वाटप कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

आज दिनांक २ सप्टेंबर रोजी वडगाव ( को ) जिल्हा परिषद शाळेतील सर्व २८३ विद्यार्थी, ६ अंगणवाडी सेविका तसेच १३ शिक्षक यांना शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार किशनचंद तनवाणी यांच्या हस्ते छत्री वाटप करण्यात आल्या . यावेळी उपजिल्हाप्रमुख अरविंद धिवर, शिवसेना शहरप्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य सागर शिंदे, उपतालुकाप्रमुख विशाल खंडागळे, विष्णू जाधव, कैलास भोकरे, लक्ष्मण लांडे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. येणाऱ्या काळात परिसरातील जिल्हा परिषद शाळेला सढळ हाताने मदत करण्याचा मानस तालुकाप्रमुख गायकवाड यांनी बोलून दाखवला. शाळेच्या वतीने आयोजक पदाधिकाऱ्यांचे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर बजाजनगर भागातील मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहटा देवी मंदिर चौक येथे हातगाडी चालक छोट्या व्यावसायिकांना मोठ्या छत्र्या वाटप करण्यात आल्या. भर पावसाळ्यात त्यांना भेटलेली ही मदत सुखावणारी होती. व्यावसायिकानी छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने जयघोष केला.

यावेळी संजय मुरादे, गणेश सूर्यवंशी, रोहित चव्हाण, सतीश हिवाळे, संतोष चंदन, लहू खराटे, दिनेश लोंढे, मंथन दाते, अमोल होर्शिल आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपतालुकाप्रमुख विशाल खंडागळे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुनील चिपटे यांनी मानले.

# डॉ. उज्वला दहिफळे यांची राष्ट्रीय आय एम ए च्या कार्यकारिणीवर बिनविरोध



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर आय एम य च्या इतिहासात प्रथमच आय एम य शहर शाखेच्या अध्यक्षा डॉ उज्वला दहिफळे यांची आय एम ए मुख्यालय दिल्ली येथे कॉलेज ऑफ जनरल प्रॅक्टिसनर्स च्या सहसचिव पदी बिनविरोध निवड झाली आहे. या पदाचा कार्यकाळ २०२४ ते २०२६ असा दोन वर्षाचा असणार आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन कॉलेज ऑफ जनरल प्रॅक्टिशनर्स ही इंडियन मेडिकल असोसिएशन ची एक शैक्षणिक शाखा आहे. जी १९६३ मध्ये स्थापन करण्यात आली होती. खच-उत्रझ चे उद्दिष्ट सामान्य वैद्यकीय व्यवहारात उच्च दर्जाचा प्रचार आणि देखभाल करणे हे आहे. बदलत्या काळानुसार काळाची गरज ओळखून आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी गरजेनुसार सीजीपी सहयोग करत आहे. सि जी पी मार्फत चठउत्रझ (आंतरराष्ट्रीय) रॉयल कॉलेज ऑफ जीपीच्या लंडन, जॉर्ज वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी, यूएसए येथून आपत्कालीन औषधांमध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा, विनायक मिशन युनिव्हर्सिटी, सालेम येथून फॅमिली मेडिसिनमध्ये डिप्लोमा आणि आपत्कालीन औषधांमध्ये डिप्लोमा ऑफर केला जातो. उत्रझ राज्य, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर वार्षिक परिषद आयोजित करते. आंतरराष्ट्रीय विद्याशाखांसह फॅमिली फिजिशियनची आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी आयोजित केली जाते. तसेच त्यांना इतर देशांतील फॅमिली डॉक्टर संकल्पनेची प्रथम माहिती दिली जाते. फॅमिली डॉक्टर चा पुनर्जन्म हे उत्रझ चे ब्रीदवाक्य सि जि पी जोमाने राबवले आहे. या नियुक्ती मुळे डॉ उज्वला दहिफळे यांना शहर शाखेचे नाव देशभर घेऊन पोचवण्यात व देशभरातील फॅमिली फिजिशियन साठी काम करण्याची संधी मिळाली आहे. यासाठी त्यांचे शाखेचे जेष्ठ सदस्य सहकारी व सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# रोडरोमिओवर कारवाई करा मनवि सेनेची मागणी

## शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात, कट्ट्यावरील टवाळखोरांचा बंदोबस्त करा.- मनोज पुंडेकर



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२ सप्टेंबर:

गंगापूर शहरातील प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालय परिसरात फिरणाऱ्या रोड रोमिओ वरती कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे गंगापूरचे पोलीस निरीक्षक विजयकुमार राठोड यांना देण्यात आले.

शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या जास्त असून शहरातील रस्त्यांवर बस स्टॉप व इतर सार्वजनिक ठिकाणी रोड रोमिओ आपल्या दुचाकीवरून स्टंट करत व मुलींना चित्र विचित्र इशारे करत फिरत असतात अशा प्रकारच्या तक्रारी काही पालकांच्या वतीने महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष मनोज पुंडेकर यांच्याकडे करण्यात आल्या होत्या व नुकत्याच घडलेल्या बदलापूर प्रकरण पाहता हा गंभीर विषय असून याची तात्काळ दखल घेऊन विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे यासाठी पालक,शिक्षक,विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी व पोलीस प्रशासन या सर्वांनी मिळून काम करावे अशी मागणी पोलीस प्रशासनाला केली लवकरच या गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेऊन कार्यवाही करावी अन्यथा जनआंदोलन छेडण्याचा इशारा मनविसेच्या वतीने देण्यात आला. यावेळी मनोज पुंडेकर अनिल नरोडे सागर पारे, चैतन्य भवार वेदांत घाटगे यांच्यासह महाराष्ट्र सैनिक व पालक उपस्थित होते.

# श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूरच्या प्रभारी प्राचार्य म्हणून प्रा.डॉ. हनुमंत मिसाळ यांची नियुक्ती

## महाविद्यालयाच्या प्राचार्या सी. एस. पाटील सेवानिवृत्त



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२ सप्मटेंबर : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूरच्या प्रभारी प्राचार्य म्हणून प्राध्यापक डॉक्टर हनुमंत दामोदर मिसाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.श्रीमती सी. एस.पाटील या दि.३१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या रिक्त जागी डॉ.मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आ.सतीश चव्हाण यांच्या आदेशाने प्रा. डॉ. मिसाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.मिसाळ यांच्या नियुक्ती बद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. ड.श्री. लक्ष्मणराव मनाळ यांनी प्राचार्य डॉ.मिसाळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे. या प्रसंगी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.श्रीमती सी.एस.पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.वैशाली बागुल, उपप्राचार्य डॉ.बी. टी.पवार, उपप्राचार्य प्रा.विशाल साबणे, पर्यवेक्षक डॉ. हरिराम सातपुते, प्रबंधक श्री.विजय आहेर तसेच सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांची उपस्थिती होती. प्रा.डॉ. मिसाळ हे यांनी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे प्राचार्य म्हणून काम केले आहे. डॉ.मिसाळ यांच्या प्राचार्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# फर्दापूर येथे रविवारी रात्री जोरदार पाऊस झाला असून पिके आडवी झाली



फर्दापूर दि २ फर्दापूर परिसरात रविवारी रात्री झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसाने चांगलीच दाणादाण उडविली आहे.अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने वाघूर नदीने रौद्ररूप धारण केले होते. पाण्याचा विसर्ग वाढतच राहिल्याने नदी शेजारील असलेल्या शेतात पाण्याने शिरकाव केल्याने तलावाचे स्वरूप प्राप्त होऊन पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.गेल्या ५ वर्षानंतर वाघूर नदीला एवढा प्रचंड पूर आल्याने पूर बघण्यासाठी गावकऱ्यांनी गर्दी केली होती. यादरम्यान,छोटे मोठे नदी,नाले ओसांडून वाहू लागल्याने शेतात जाण्यासाठी चांगलीच तारांबळ उडाली होती.मात्र,अतिवृष्टीने परिसरातील कपाशी,मका,सोयाबीन पिक जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढवले आहे.अजिंठा लेणीच्या माथ्यावर वसलेल्या लेनापुर गावात पुराचे पाणी शिरल्याने गावकऱ्यांची चांगलीच पंचाईत झाली.यावेळी अजिंठा लेणीतील पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू असणारा सप्तकुंड धबधब्याने रौद्ररूप धारण केल्याचे पाहायला मिळाले. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# पर्युषण पर्वाच्या पहिल्या दिवशी गायक आकाश शहा संपुर्ण सिडको भक्तीमय

## शहरातील सर्व जैन मंदिरात ४०० बालकांनी केली पूजा



छत्रपती संभाजीनगर : गुरू गौतम श्री श्वेतांबर वर्धमान जैन सेवा संघ, सिडको तर्फे शनिवार दि. ३१ ऑगस्ट ते ०८ संप्टेबर या दरम्यान श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय प्रागणात पर्युषण महापर्व आराधने चे आयोजन करण्यात आले आहे.

पर्युषण पर्वाच्या पहिल्या दिवशी श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालयामध्ये सकाळी ६.०० वाजता शहनाई वादन, सकाळी ६.३० वाजता श्री शंखेश्वर पार्श्वनाथ भगवान, आदेश्वर भगवान, कुंथुनाथ भगवान, शांतीनाथ भगवान, मुनि वत स्वामी भगवान, महावीर स्वमी भगवान, गौतम स्वामी, सरस्वती माता, पद्मावती माता, मणिभद्रवीर स्वामी आदि भगवतांचा अभिषेक करण्यात आला. सकाळी ७.०० ते ८.०० वाजेपर्यंत संगीतमय स्नात्र पुजा झाली. सकाळी ८.०० वाजता भगवतांची आरती करण्यात आली. संध्याकाळी ६.३० वाजता प्रतिकमण झाले.

## सुभद्रा गायकवाड यांचे निधन



वाळूज महानगर : सिडको वाळूज महानगर येथील सुभद्रा गुंडाजी गायकवाड (८२) यांचे सोमवारी (दि.२) सकाळी ११:०० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. दुपारी मोहटादेवी मंदिरासमोर, बजाजनगर, वाळुज एमआयडीसी येथील स्मशानभूमित त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती , एक मुलगा ,दोन मुली , जावई , सुन व नातवंडे असा परिवार आहे. त्या शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख प्रा. डॉ. बी.जी.गायकवाड यांच्या मातोश्री व संकल्प बिल्डर्स ण्ड डेव्हलोपर्सचे संचालक संकल्प गायकवाड यांच्या आजी होत.

## महाविद्यालयाच्या परिसरात रॅगिंग करणे हा कायद्याने गुन्हा आहे : ॲड. प्रदीप जाधव

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०३ सप्टेंबर - भारतीय राज्यघटनेच्या विविध कलमान्वये महाविद्यालय व महाविद्यालयाच्या परिसरात कोणत्याही व्यक्तीकडून, कोणत्याही प्रकारची रॅगिंग करण्यास सक्त मनाई असून, अशाप्रकारच्या गुन्ह्यासाठी कायद्यांर्गत कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली असल्याचे मत ड. प्रदीप जाधव, दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड यांनी व्यक्त केले. ते संत तुकाराम कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अँटी रॅगिंग कक्षाच्या विशेष व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी ॲड. टी.डी. शिंदे, ड. पगारे यांनीही आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर डॉ.सरला गोरे, प्रा. मकरंद जोशी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँटी रॅगिंग कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी एकुर्केकर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. रमेश वाघचौरे यांनी केले. प्रा. प्रवीण गायकवाड यांनी आभाप्रदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रो.डॉ. सुनीता शिंदे- देशमुख, उपप्राचार्य डॉ. शरद गावंडे, डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ.बबन आमले, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सुधीर पवार, डॉ. कल्पना देशमुख, प्रा. विद्या देवकर, प्रा.प्रवीण काथार, डॉ. सूर्यकांत सांभाळकर आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी मोठ्यासंख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

## सोयगाव येथील जनसेवा भवानी मित्र मंडळ भवानीनगर येथील युवकाकडून पोळा उत्साहात



सोयगाव,दि.२ सप्टेंबर : सर्वत्र पोळा सण उत्साहात साजरा होत असताना सोयगाव येथील भवानीनगर येथील जनसेवा भवानी मित्र मंडळच्या तरुणांनी पारंपरिक पद्धतीने शेतकरी बांधवांचा मित्र असलेल्या बैलाला सजवून श्री हनुमान मंदिर,श्री मरीआई माता,श्री खंडोबा महाराज यांचे दर्शन करून बैलास पुरण पोळीचा नैवेद्य खायला देऊन बैलपोळा सण उत्साहात साजरा करण्याची परंपरा कायम ठेवली.

याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष अर्जुन गुजर,कृष्णा पाटील, नारायण जावळे,रवींद्र जावळे,अनिल गोतमारे,किशोर खिरडकर,ईशवर परदेशी,भैया पवार,गोपाल पवारभगवान पाटील,दीपक चौधरी,अमोल चौधरी,श्रीकांत बोरसे,सुरेश महाले इत्यादी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बैलपोळा सण उत्साहात साजरा केला.


# कोसळधारेने केले जिल्ह्याचे जनजीवन विस्कळीत

## लाखों हेक्टरवरील पिकांचे नुकसान, अनेक घरांची पडझड तर अनेक गावांमध्ये जनजीवन विस्कळीत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हयात दोन दिवसांपासून अति मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे कपाशीचे तसेच स्वयाबिन पिकांचे नुकसान झालेले आहे . त्याच बरोबर जालना जिल्ह्यातील बहुतांश लघु व मध्यम तलाव हे सर्व अति मुसळधार पावसामुळे ओअर फ्लो झाले असून अनेक नद्या नाल्यांना दुथडी भरूण पाण्याचा पुर आला आहे त्यामुळे मंठा तालुक्यातील अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा घातला होता . तसेच घनसावंगी तालुक्यातील देवि देहगाव बृ ल . प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरलेला आहे त्याच बरोबरीने कसुरा नदीवरील श्रीष्टी पाझर तलाव ओसेडुण वाहत आह नागसेन प्रकल्प पूर्ण ज्ञमतेने भरुण ओअर फ्लो झाला आहे तसेच दुधना नदी दुथडी भरुन वाहत आसताना निम्न दुधना प्रकल्पात आज दुपारी ८० टक्के पाणीसाठा झाला आहे . येणारा विसर्ग पाहता प्रशासनाने प्रकल्पातील चार दरवाजे चार मिटरने उघडले आसून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे .




## संक्षिप्त

### भोकरदनमधुन चंद्रकांत दानवेंची उमेदवारी निश्चित!



**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या वतीने महाराष्ट्रातील विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये ५५ गावांमध्ये घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विविध मतदार संघात २९ ऑगस्ट. २०२४ ते २ सप्टेंबर . २०२४ दरम्यान घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांच्या आदेशानुसार जइउ प्रमुख वक्ते श्री शिवकुमार देवकाते हे बैठकीची नेतृत्वात . घोंगडी बैठकीच्या माध्यमातून पक्षाचे ध्येय धोरण आणि राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेबांचे गेल्या पन्नास वर्षातल्या राजकारणात महाराष्ट्रासाठी दिलेले योगदान आणि ओबीसीसाठी केलेल्या कामासंदर्भात माहिती या बैठकीच्या माध्यमातून देण्यात आली आहे. तसेच माजी आमदार चंद्रकांत दानवे साहेब यांना उमेदवारीसाठी ग्रीन सिग्नल देण्यात आला घोंगडी बैठकीचा पहिला टप्पा २९ ऑगस्ट २०२४ ते ०२ सप्टेंबर २०२४ दरम्यान पूर्ण झालाआहे या बैठकीमध्ये राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रमेश शेठ सपकाळ, तालुकाध्यक्ष रामधन पाटील कळंबे ,युवकचे प्राध्यापक अंकुश जाधव सर, श्री नितीन शिवणकर, ओबीसी सेलचे वर्धमान वास्कर ,श्री विठ्ठल गोरे, यांचा प्रामुख्याने सहभाग होता तसेच पत्रकार परिषदेला उपस्थित पदाधिकारी खालील प्रमाणे माजी उपनगराध्यक्ष शफिक शेठ पठाण, लक्ष्मण ठोंबरे ,नसीम पठाण, कबीर बापू ,रमेश बर्डे, राधाकिसन भोसले नजीम शहा, सय्यद आरिफ, बंटी काका ,गजानन जाधव, राजू बोराडे , घोडे टेलर, अंगद सहाने, शंकर भुजाडे तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते विधानसभा मतदार संघात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

### आ.राजेश टोपे यांनी केल्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा विधानसभा सदस्य आदरणीय राजेश टोपे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, ओबीसी सोशल मीडिया, तालुका अंबड यांच्या वतीने काही नवनिर्वाचित ओबीसी बांधवांची खालील प्रमाणे पदावर नेमणूक करण्यात आली. अमोल बळीराम राठोड - अंबुनाईक तांडा, चिटणीस - ओबीसी सो.मि. अंबड तालुका, भोलेनाथ कल्याण सुडके - गुंडेवाडी, सरचिटणीस - ओबीसी सो.मि. अंबड तालुका, माधव साहेबराव लिपणे - महाकाळा, सर्कल प्रमुख - ओबीसी सो.मि.शहागड, मुकुंद रघुनाथ खाडे - रामगव्हाण, सर्कल प्रमुख - ओबीसी सो.मि.साष्ठ पिंपळगाव सुनील ज्ञानदेव मुसळे - रुई, सर्कल प्रमुख - ओबीसी सो.मि.गोंदी रामकिसन हब्बू जाधव - मठ तांडा, सर्कल प्रमुख - ओबीसी सो.मि. धाकलगाव ऋषिकेश सुरेश मुकुटकर - शहापूर, गणप्रमुख - ओबीसी सो.मि.धाकलगाव, आदित्य भारतराव वरकड - अंतरवाली सराटी, गणप्रमुख - ओबीसी सो.मि. वडीगोद्री, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, सोशल मीडिया चे जालना जिल्हाध्यक्ष ऍड. सचिन पवार, जालना जिल्हा कार्याध्यक्ष दादासाहेब लटपटे, ओबीसी सोशल मीडिया अंबड तालुकाध्यक्ष श्री. संजय देवगिरे, जयरामभाऊ गावडे, रामगव्हाण चे माजी सरपंच सलीमभाई, रुई सोसायटीचे चेअरमन दत्ताभाऊ साळे, अरुण चपटे,राजुभाऊ शिंदे, बाबासाहेब माने व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाढती गुन्हेगारी व व्यापारी वर्गावर होणारा दरोडा याविरुद्ध विशेष मोहीम राबवा -अरविंदराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरासह ग्रामीण भागामध्ये वाढती गुन्हेगारी व व्यापारी वर्गावर होणारे दरोडे व खून यासारख्या घटना दिवसाढवळ्या गेल्या अनेक महिन्यांपासून सररासपणे घडत असून दिवसानदिवस त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. या वाढत्या गुन्हेगारी व दरोड्यांवर विशेष मोहीम राबवून गुन्हेगारी वर्गाच्या विरोधात कडक कारवाईची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शहरातील व्यापारी वर्गावर होणारे दरोडे,जीवघेणी मारामारी, खून व लुटमार यासारख्या घटनांचे प्रमाण तीन ते चार महिन्यांपासून सुरू आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीररित्या निर्माण झाला असून सर्वसामान्य व्यक्ती भीतीच्या व दहशतीच्या वातावरणाखाली जगत आहे. शहर पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनामार्फत या वाढत्या गुन्हेगारीच्या विरोधात कारवाईची गती फार शिथिलरीत्या होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीला एक प्रकारे अभय देण्याचे काम होत आहे की काय? याबाबत सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये संशय निर्माण होत आहे. यासारख्या घटनांवर त्वरित आळा घालण्यासाठी गुन्हेगारी वर्गाच्या विरोधात कडक कारवाईची विशेष मोहीम राबवून शहरातील व ग्रामीण भागातील ज्ञात असलेली सर्व गुन्हेगारांचे ठिकाणांची झडती घेण्यात यावी व त्यांचा बंदोबस्त करावा. या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्ती ला आळा बसेल. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अभय निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखता येईल असे शेवटी निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण ,जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, महिला शहराध्यक्ष रिंकल तायड, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, भटक्या विमुक्त सेलचे जिल्हाध्यक्ष विजय सोनवणे, सामाजिक न्याय विभागाचे कार्याध्यक्ष अमोल खरात, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष नवनाथ लोखंडे,सद्दाम चाउस,सलमान पठाण ,सागर ठाकूर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## पोळा उत्साहात साजरा; सर्जा राजाची वाजत गाजत मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर शहर व परिसरात आज दिनांक २ सप्टेंबर सोमवारी शेतकऱ्यांचा सण पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शहरातील शेतकरी बांधवांनी आपापल्या बैलांना सजवून व त्यांची पूजा करून शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढली शहरातील मुख्य मार्गावरून रेल्वे स्टेशन मारुती मंदिरात ही मिरवणूक काढण्यात आली यावेळी बैलांचे मारुती दर्शन करून पुन्हा आपल्या घरी आणण्यात आले यावेळी शेतकरी बांधवांनी आपल्या परिवारासह विधिवत पूजा करून महिलांना पुरणपोळीचा घास देत नैवेद्य दिला दोन दिवसात परिसरात जोरदार झालेल्या पर्जन्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये गुडघ्यावर पाणी असतानाही पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला शहरातील जुना मोंढा भागातील दत्त मंदिर गवळी गल्ली आदी भागातून आपापल्या सर्जा राजांना सजवून शहरातून मिरवणूक काढण्यात आली.

## राज्य सरकारच्या विरोधात जालन्यात मविआचे जोडे मारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

मालवण येथे निकृष्ट पद्धतीने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळल्यामुळे देशातील जनतेच्या अस्मितेला काळीमा फासणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात आज रविवार रोजी जालना जिल्हा महाविकास आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोडो मारो आंदोलन करून शासनाचा तीव्र निषेध करण्यात आला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोसळलेल्या पुतळा प्रकरणी महविकास आघाडीच्या वतीने आज रविवारी जिल्ह्याच्या ठिकाणी जोडो मारी आंदोलन करून शासनाचा तीव्र निषेध करण्यात आला. या अनुषंगाने जालना येथेही महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले.यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणा देत जालनेकरांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकार भ्रष्टाचाराने बरबटलेले असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारण्याच्या कामात देखील भ्रष्टाचार करण्याचा नीचपणा करून देशाच्या अस्मितेला कलंक लावण्याचा दुर्दैवी प्रकार समोर आल्याने त्याच्या प्रवृत्तीची देशाला जाणीव झाली आहे असे सांगत आ. गोरंटयाल यांनी शासनाचा तीव्र शब्दात निषेध केला. शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, महायुती सरकारने भ्रष्टाचाराचे अनेक मोठी प्रकरण केल्याचे उघड झाले आहे. परंतु हा प्रकार जनतेच्या अस्मितेचा असल्याने जनता त्यांना कदापि माफ करणार नाही. कार्यकर्त्यांनी त्यांचा हा निंदनीय प्रकार गावागावात जाऊन सांगावा आणि हे भ्रष्ट सरकार खाली खेचल्याशिवाय जनता गप्प बसणार नाही असा विश्वास शेवटी अंबेकर यांनी व्यक्त केला. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख यांनी सदर घटनेचा तीव्र शब्दात निषेध करत महायुतीचे सरकार खाली खेचून जनता सरकारचा बदला निश्चितपणे घेईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी आमदार संतोष सांबरे, शिवसेना नेते डॉ.संजय लाखे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, शहरप्रमुख बाला परदेशी, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेंद्र राख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे यांनी आपल्या भाषणातून राज्य शासनाचा तीव्र शब्दात निषेध केला. या आंदोलनाचे प्रास्ताविक करतांना जालना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शेख महेमुद यांनी आंदोलनामागील भूमिका विषद केली. यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल, रमेश पाटील गव्हाड, मुरलीधर शेजुळ, मनीष श्रीवास्तव, राम सावंत, नंदाताई पवार, वसंत जाधव, दिनकर घेवंदे, हरिहर शिंदे, बाबू पवार, मनकरनाताई डांगे, गंगुबाई वानखेडे, मंगल मिटकर, विभा लाखे, राजेंद्र जाधव, दुर्गेश काठोठीवाले, महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, जगदीश भरतिया, कृष्णा पडूळ, सय्यद अझहर, शेख शकील, विनोद रत्नपारखे, विजय पवार, विनोद यादव, योगेश पाटील, किशोर गरदास, गोपाल मोरे, आनंद वाघमारे, राजन बर्टी, प्रमोद अल्हाट, गुड्डू खान, करीम लिडर, विकास जगधने, अशोक भगत, शेख फारुख, गणेश चांदोडे, बाबासाहेब सोनवणे, जावेद अली, नारायण वाढेकर, शेख इर्शाद, नारायणराव शिंदे, जलिंधर डोईफोडे, रघुवीर गुडे, शेख वसीम, बाळकृष्ण कोताकोंडा, संजय पाखरे, अनास चाऊस आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आगामी निवडणुकीत परिवर्तन घडविण्याची गरज -रामेश्वर जंजाळ

### देळेगव्हाण येथुन प्रारंभ तर पारध येथे ४ सप्टेंबर रोजी समारोप

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



केंद्र आणि राज्य सरकारच्या मनमानी धोरणामुळे घरगुती सिलेंडर, पेट्रोल, इलेक्ट्रिक बिल, यांचे गगनाला भिडलेल्या दरामुळे जनता मेटाकुटीस आली असून शेतकर्यांच्या मालाला मिळणारा अत्यल्प भाव यामुळे शेतकरीही कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे आताच झालेल्या लोकसभा निवडणुकीप्रमाने आगामी विधानसभा निवडणुकीत परिवर्तन घडविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने युवानेते रामेश्वर जंजाळ यांनी केले.

भोकरदन विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्यांसह शेतकर्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने युवानेते रामेश्वर पाटील जंजाळ यांनी जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण येथून २१ ऑगस्टपासुन महापरिवर्तण यात्रेस प्रारंभ केला आहे. या माध्यमातून शेतकर्यांसोबत संवाद करुन समस्या जाणून घेण्यात येत आहे.

भोकरदन विधानसभा क्षेत्रात १५ दिवसात प्रत्येक गावोगावी व घरोघरी जावुन महिला शेतकऱ्यांचा समस्या जाणून घेत आहे. ४ सप्टेंबर रोजी पारध येथे समारोप करण्यात येणार आहे. या महापरिवर्तण यात्रेच्या माध्यमातून जनतेच्या विविध समस्या जाणून घेऊन त्याचा शासन दरबारी पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती रामेश्वर जंजाळ यांनी दिली. या यात्रेत रामेश्वर जंजाळ व त्यांचे सहकारी गावा गावात मुक्काम करत आहे. पुढे बोलतांना जंजाळ म्हणाले की, आज जीवनावश्यक वस्तूचे प्रचंड भाव वाढवून महागाईने सर्वांचे कंबरडे मोडले आहे. ४१० रुपयाला मिळणारे सिलेंडर आता ८५० रुपयाला विकत घ्यावे लागत आहे. पेट्रोल डिझेलचे भाव आकाशात भिडले आहेत. ६० रुपये लिटरचे डिझेल ९५ रुपये वाढ झाली आहे. शिक्षणाची फी वाढली. जीवनाश्यक वस्तुंवर ५ टक्के जीएसटी टॅक्स लावला जात आहे. बेरोजगाराची थट्टा लावली उच्च शिक्षित तरुणांसाठी कंत्राटी पद्धत सुरू करून शासन ठेकेदार बनले. शाळा, महाविद्यालय, बस, रेल्वे याच खाजगीकरण सुरू झाले. ग्रामीण भागात दवाखाने नाही आणि दवाखाना आहे तर डॉक्टर नाही अशी विदारक परिस्थिती आपल्या मतदार संघामध्ये दिसून येत आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप रामेश्वर जंजाळ यांनी केला.

।भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदार संघातील हुकूमशाही मोडीत काढून शेतकरी, कष्टकरी, महिला व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महापरिवर्तण यात्रा काढण्यात आली आहे. या यात्रेच्या माध्यमातून आम्ही दररोज पंधरा ते वीस गावात भेट देऊन शेतकऱ्यांसह महिलांच्या समस्या जाणून घेण्यात येत आहे. भोकरदन विधानसभा मतदारसंघातील हुकूमशाही मोडीत काढण्याचा आणि शेतकरी, कष्टकरी, सर्व सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा उद्देश आहे असे रामेश्वर जंजाळ यांनी सांगितले.

## मंठ्यात मुख्य रस्त्यांवर आले नाल्यांचे पाणी

### मिळून-मिसळून खाणाऱ्या न.पं.चा भोंगळा कारभार पडला उघडा! छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास आले तळ्याचे स्वरूप?

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/नागेश कुलकर्णी**

तालुक्यात आतापर्यंत पडलेल्या रिमझिम पावसाने खरीप पिकाची चांगली वाढ होऊन मुगाचे पिक काढणीला आहे. तर कपाशी व सोयाबीन पिकाची परिस्थिती देखील चांगली आहे. परंतु तालुक्यात दमदार पाऊस नसल्याने जलसाठे व विहिरीच्या पाणी पातळीत अपेक्षित वाढ झाली नव्हती. तालुक्यात दमदार पाऊस पडावा. अशी शेतकरी व जनतेची अपेक्षा होती.

तालुक्यात शनिवारी ( ता. ३१ ) मध्यरात्री पासून पावसास सुरुवात झाली तर रविवारी ( ता. १ ) दिवसभर ढगाळ वातावरण व पाऊस सुरू होता. तर दुपारपासून सायंकाळपर्यंत मुसळधार पाऊस पडला असून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकास तळ्याचे स्वरूप आले होते. तसेच शहरातील रस्त्याला नदीचे स्वरूप आले. यावर्षी पावसाळ्यातील हा पहिलाच दमदार पाऊस आहे. मुसळधार पाऊस पडत असल्याने शहरातील देवी मंदिर रस्ता, तुकाराम नगर, मंठा जिंतूर रस्ता परिसर या सकल भागात राहणाऱ्या अनेक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणीचे शिरल्याने नुकसान झाले आहे. तसेच मंठा-विडोळी रस्त्यावरील ओढ्याला पूर आल्याने या मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. तळतोडी,ऊमरखेडा,अंभोरा शेळके खोराडसावगी आनंदवाडी पेवा याअनेक गावात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्या ओढ्याकाळच्या शेत जमिनीचे व पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अंभोरा शेळके गावातील सोपान सदर, तुळशीराम सदर, धोंडीबा सदर, सुदाम खरात यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले असून घरात बसण्याकरिता जागा नाही असे अंभोरा शेळकेचे माजी सरपंच शिवशंकर डोईफोडे यांनी सांगितले तर तालुक्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली असून पांगरी खुर्द येथील तलाव पूर्ण भरला आहे पांगरी खुर्द येथे जालना येथून ( एन डी आर एफ ) बचाव पथक टीम येत असल्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांनी सांगितले.

**अग्रलेख...**

# महायुतीचा विकास कामांचा झंझावात

राज्यातील पायाभूत विकासासाठी आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीचे प्रकल्प सुरू असून विविध विकास कामांमुळे गुजरात व कर्नाटकपेक्षा महाराष्ट्र हा संपूर्ण देशात सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे, हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उद्गार राज्याच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीचे चित्र स्पष्ट करणारे आहे. विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १,५६३ कोटी रुपयांच्या मत्स्य व्यवसाय प्रकल्पाचे व योजनांचे लोकार्पण झाले. केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील महायुती सरकारच्या जबरदस्त राजकीय इच्छाशक्तीमुळेच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागला. वाढवण बंदरात प्रचंड मोठी गुंतवणूक व या परिसरात होणार असून सुमारे १२ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. मात्र, गेल्या ६० वर्षांतील काँग्रेसी सरकारच्या कार्यकाळात हा प्रकल्प मार्गी लागला नाही. या महत्त्वाच्या कामाला काही लोकांनी सुरुवात होऊ दिली नाही, हे पंतप्रधानांचे प्रतिपादन काँग्रेसी सरकारच्या नकारात्मक मानसिकतेवर प्रकाश टाकणारे आहे. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या गेल्या आठ वर्षांच्या कार्यकाळाकडे बघितले पाहिजे. उबाठा गटाची मधली दोन-अडीच वर्षे तर अवघा आनंदीआनंद होता. वाढवण बंदरासारखे काम मधली अडीच वर्षे पूर्णपणे ठप्प पडले होते. पण, शिंदे-फडणवीस-अजित पवार यांच्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासाचा आलेख उंचावत आहे, हे येथे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यपातळीवर थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला आहे. केंद्रीय औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने (डीआयपीपीटी) काही दिवसांपूर्वी थेट परकीय गुंतवणुकीबाबतचा (एफडीआय) अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार देशातील एफडीआय आकर्षित करण्यात महाराष्ट्र २०२२-२३ मध्ये प्रथम क्रमांकावर राहिल्यानंतर आता २०२३-२४ या आर्थिक वर्षातदेखील पहिल्या क्रमांकावर आला आहे. केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने नुकतीच या संदर्भातील आकडेवारी जाहीर केली. या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राने गेल्यावर्षीपेक्षा अधिक परकीय गुंतवणूक यावर्षी प्राप्त केली आहे. डीपीआयआयटीच्या अहवालानुसार २०२२-२३ या आर्थिक वर्षात १,१८,४२२ कोटी रुपये तर २०२३-२४ या वर्षात १,२५,१०१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. विशेष म्हणजे गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश आणि ओडिशा यासह विविध राज्यांशी तीव्र स्पर्धा असूनही २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशातील थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्राने अव्वल स्थान कायम ठेवले असल्याचे अहवालातून समोर आले आहे. आर्थिक वर्षातील गुंतवणूक ही गुजरातमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा दुपटीहून अधिक आहे तर दुसऱ्या क्रमांकावरील गुजरात आणि तिसऱ्या क्रमांकावरील कर्नाटकच्या एकूण बेरजेपेक्षाही अधिक आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे महाविकास आघाडीच्या काळात गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पिछाडीवर होता. आणखी एक महत्त्वाची व नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत या मोदी सरकारच्या संकल्पनांचा लाभ देशाला होत असून यात महाराष्ट्राचे योगदान फार मोठे आहे. मार्च २०२४ पर्यंत अखिल भारतीय स्तरावर केंद्र सरकारद्वारे मान्यताप्राप्त स्टार्टअप्समध्ये राज्याचा वाटा सर्वाधिक म्हणजे १९ टक्के इतका आहे. तर २०२२-२३ मध्ये भारतातून होणाऱ्या एकूण निर्यातीमध्ये राज्यातून होणाऱ्या निर्यातीचा वाटा १६ टक्के इतका होता. राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकार, जागतिक बँक, आशियाई विकास बँक आदींच्या माध्यमातून निधीची उभारणी केली जात आहे. राज्याचे देशाच्या झपाट्याने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाचे योगदान राहिले आहे. २०२४ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) महाराष्ट्र प्रथम स्थानी होता, असा अहवाल काही महिन्यांपूर्वी भारतीय स्टेट बँकेने प्रकाशित केला होता. आता राज्याने यापेक्षाही अधिक उंच भरारी मारण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केले आहेत. सुयोग्य नियोजन, इच्छाशक्ती, प्रयत्न, सातत्य व योग्य दिशेने वाटचाल केली तर आर्थिक आघाडीवर उत्तम यश प्राप्त होऊ शकते आणि देशाची अर्थव्यवस्था तारण्यास भरीव मदत होऊ शकते, हे महायुती सरकारने सिद्ध केले आहे. महाराष्ट्र हे देशातील आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत पुढारलेले राज्य म्हणून ओळखले जाते. अनेक बाबींमध्ये महाराष्ट्र पुढे आणि देशातील अन्य राज्ये मागे असे चित्र पाहायला मिळते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही महाराष्ट्राचे पुढारलेपण पाहायला मिळते आहे. जागतिक आर्थिक परिस्थितीमुळे तसेच जगातील अनेक विकसित देशांतील अर्थव्यवस्था उतरणीला लागल्यामुळे भारतासारख्या झपाट्याने विकसित होऊ पाहणाऱ्या देशांना अनेक संधी उपलब्ध आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे सध्या केंद्रासमोर आर्थिक आघाडीवर मोठी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रावर अधिक जबाबदारी येऊन पडतात. या देशाचा आर्थिक, औद्योगिक डोलारा सांभाळण्यात, अडचणीच्या, संकटाच्या काळात देशाला खंबीर आधार देण्यात महाराष्ट्राने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोरोनाच्या भयावह संकटानंतर महाराष्ट्राने आपली जबाबदारी ओळखून देशाला भरीव आर्थिक योगदान दिले. महाराष्ट्राचे सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) अंदाजे ४३५ अब्ज डॉलर्स (२०२२-२३) आहे; ज्यामुळे महाराष्ट्र ही भारतातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनते. भारताच्या जीडीपीमध्ये राज्याचा वाटा १२.९२ टक्के आहे आणि त्यांचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्राच्या भरभराटीच्या अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असंख्य महत्त्वपूर्ण घटक आहेत जे त्याच्या वाढीला चालना देण्यासाठी सुसंवादीपणे एकत्र येतात. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, सिंचन, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण इत्यादी प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. महायुती सरकारच्या धोरणात्मक पुढाकारांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सर्वांगीण विकासात रूपांतर झाले आहे. शिवाय आयटी, माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा (आयटीईएस), इलेक्ट्रॉनिक्स आणि 'कॅप्टिव्ह बिझनेस आऊटसोर्सिंग' यासारख्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचे योगदान महत्त्वाचे आहे. तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेत विशेषतः ऑटोमोबाईल आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योग समूहांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. तांत्रिक कुशल मनुष्यबळ, उत्कृष्ट अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, खाजगी क्षेत्रातील दर्जेदार शिक्षण संस्था, रोजगाराभिमुख शिक्षण, स्वयंरोजगार निर्माण करण्यास हातभार लावणाऱ्या राज्य सरकारच्या विशेष योजना इत्यादी घटकांचे देखील महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान आहे. सरकारच्या कारभारात पारदर्शकता असेल, राज्यात उत्तम कायदा आणि सुव्यवस्था असेल, भ्रष्टाचार व लाचलुचपत याचे प्रमाण कमी असेल, नोकरशाहीचे अडथळे अर्थात लालफीतशाही नसेल, तत्काळ निर्णय घेणारी प्रशासकीय यंत्रणा असेल, कर्तव्यदक्ष, सजग, सक्षम आणि महत्त्वाकांक्षी अधिकाऱ्यांची चमू शासनाजवळ असेल आणि मुख्य म्हणजे सरकारची म्हणजेच राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती प्रबळ तर अशीच राज्ये आर्थिक व औद्योगिक आघाडीवर सातत्याने प्रगती करू शकतात. महाराष्ट्राने ही गोष्ट सिद्ध केली आहे.

**दिल्ली दिनांक**

**रवींद्र दाणी**

# सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निवाडा!

'जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद,' असा निर्णय देणाऱ्या न्या. गवई व न्या. विश्वनाथन यांचे नाव न्यायिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. झारखंडमधील एका प्रकरणात हे परिभाषित व प्रतिपादित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे पीएमएलए म्हणजे 'प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉण्ड्रिंग ॲक्ट'च्या संदर्भात न्यायमूर्तींनी हे म्हटले आहे.

**स्वातंत्र्य अधिकार :** 'व्यक्तिस्वातंत्र्य हा नेहमीच नियम राहिलेला आहे आणि कायदेशीर प्रक्रियेचा वापर करून हे स्वातंत्र्य हिरावून घेणे ही अपवादाची स्थिती असावी,' असे परखड भाष्य सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. न्या. गवई व न्या. विश्वनाथन यांनी आपल्या निवाड्यात हा मुद्दा विषद करताना फार प्रभावी युक्तिवाद केला आहे.

**कविता यांना जामीन :** सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली मद्य घोटाळ्यातील एक आरोपी तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री डॉ. चंद्रशेखर राव यांच्या कन्या कविता यांची जामिनावर सुटका केली. हा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी सीबीआय व अंमलबजावणी संचालनालयावर (ईडी) केलेले भाष्य चिंताजनक आहे. तुम्ही या साऱ्या प्रकरणात पकडलेल्या आरोपींचे कबुलीजबाब पुरावे म्हणून सादर केले आहेत. अन्य कोणताही पुरावा तुम्हाला सादर करता आलेला नाही. याला निष्पक्ष चौकशी म्हणावयाचे काय, असा धारदार प्रश्न न्यायालयाने विचारला आहे. वास्तविक, सीबीआय वा ईडीने असा प्रश्न विचारण्याची वेळ येऊ द्यावयास नको होती. या दोन्ही चौकशी संस्थांच्या काही अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे ही स्थिती उद्‌भवल्याचे सांगण्यात येते. वास्तविक, दिल्ली मद्य घोटाळ्याची चौकशी मागील अनेक महिन्यांपासून सुरू आहे. या संस्थांनी चौकशी पूर्ण करून आरोपपत्र दाखल करून या खटल्याची जलदगतीने सुनावणी होण्यावर भर द्यावयास हवा होता. न्यायालयाने जो निवाडा दिला असता तो देशासमोर आला असता. पण, या संस्थांनी वेळकाढू भूमिका घेतल्याने त्यांच्यावर न्यायालयाने कठोर भाष्य करण्याची वेळ आली आहे. अर्थात यासाठी सरकारला जबाबदार धरता येणार नाही.

**केजरीवालही सुटणार? :** सर्वोच्च न्यायालयाची ही भूमिका पाहता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल लवकरच तिहारबाहेर येतील. तसे झाल्यास दिल्ली मद्य घोटाळ्यातील तिघेही प्रमुख आरोपी केजरीवाल, सिसोदिया व कविता जामिनावर बाहेर असतील आणि ही बाब सीबीआयची विश्वसनीयता वाढविणारी ठरणार नाही. सरकार कोणतेही असो सीबीआयची कार्यक्षमता हा एक वादाचा मुद्दा राहिलेला आहे. सीबीआयने अनेक महत्त्वाची प्रकरणे अतिशय बेजबाबदारपणे हाताळली आहेत. दिल्ली मद्य घोटाळ्यात त्याची पुनरावृत्ती होण्याचे संकेत आहेत. असे झाल्यास सीबीआयच्या विश्वसनीयतेला बसलेला हा एक मोठा धक्काच मानला जाईल.

**तातडीने नाही :** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा तिहारमधील मुक्काम फार लवकर संपेल असे वाटत होते; पण तसे झालेले नाही. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची सुटका झाल्यावर काही दिवसातच आपली सुटका होईल, असे केजरीवाल यांना वाटत होते. पण, सर्वोच्च न्यायालयाने असा कोणताही निर्णय न घेता, ईडीला आपली बाजू मांडण्याची संधी देण्याचा निर्णय घेतला. पुढील सुनावणीत ईडी आपली बाजू मांडील व नंतर सर्वोच्च न्यायालय याबाबत निर्णय घेईल, असे दिसते.

**सरकार बेवारशी :** केजरीवाल यांची सुटका होईपर्यंत दिल्लीत बेवारशी सरकारचे कामकाज सुरू राहील. मार्च महिन्यात केजरीवाल यांना अटक झाली आणि तेव्हापासून दिल्ली सरकारचे काम ठप्प आहे. कारण सरकारी निर्णयांना मुख्यमंत्र्यांची मंजुरी आवश्यक असते. सरकारी फाईलींवर सारे निर्णय नमूद करून नंतर त्यावर मुख्यमंत्र्यांची सही केली जाते. पाच महिन्यांपासून मुख्यमंत्रीच तिहारमध्ये असल्याने ना कोणता निर्णय घेण्यात आला, ना सरकारी फाईली तयार झाल्या ना त्यावर मुख्यमंत्र्याची सही झाली.

**१५ ऑगस्टचा कार्यक्रम :** दिल्ली सरकारचा १५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन कार्यक्रम छत्रसाल स्टेडियममध्ये आयोजित केला जातो. यावर्षी मुख्यमंत्रीच तुरुंगात असल्याने एक मंत्री आतिशी यांनी झेंडावंदन करावे, असा आदेश केजरीवाल यांनी तुरुंगातून दिला होता. पण, नायब राज्यपालांनी तो फेटाळून लावत गहलोत या मंत्र्यास झेंडावंदनासाठी नियुक्त केले. दिल्लीत जे काही घडत आहे ते सारे संसदीय इतिहासात नोंदले जाणार आहे. मागील ७५ वर्षांत देशात असे कुठेही घडलेले नाही, जे दिल्लीत सध्या घडत आहे. दिल्लीत एक लोकनिर्वाचित सरकार आहे, पण या सरकारचा प्रमुख भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात असल्याने नायब राज्यपालांना सारे कामकाज पार पाडावे लागत आहे. याने दिल्ली सरकारच्या प्रशासनाची काय अवस्था झाली असावी, याची कल्पनाच न केलेली बरी. मुख्यमंत्री केजरीवाल त्यांची सुटका झाल्यानंतर ते जनतेत जाऊन हा सारा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करतील. पण, त्यांना जनता किती प्रतिसाद देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राजधानीत २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. पहिल्या दोन निवडणुकीत केजरीवाल प्रचंड बहुमताने विजयी झाले. तो आकडा त्यांना येणाऱ्या निवडणुकीत निश्चितच गाठता येणार नाही. आम आदमी पक्षाच्या जागा कमी होणार हे ठरले आहे. फक्त किती कमी होणार, हे निवडणुकीनंतर दिसेल.

**सिसोदिया नवे मुख्यमंत्री? :** दिल्ली विधानसभेची तयारी म्हणून माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना मुख्यमंत्री करण्याचा विचार आम आदमी पक्षात केला जात आहे. कारण, केजरीवाल यांना जामीन मिळाला तरी सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या एका प्रकरणात त्यांना जामीन देताना, त्यांनी दिल्ली सचिवालयात जाऊ नये तसेच फाईलींवर सह्या करू नयेत, अशा दोन अटी टाकल्या आहेत. या अटी पाहता केजरीवाल यांना मुख्यमंत्री म्हणून काम करता येणार नाही. सिसोदिया यांच्यासाठी अशा कोणत्याही अटी न्यायालयाने टाकलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे दिल्लीची सूत्रे सोपविण्याचा विचार पक्षात केला जात आहे. अर्थात याचा निर्णय केजरीवाल यांची सुटका झाल्यावरच होण्याची शक्यता आहे तर आपच्या काही नेत्यांच्या मते केजरीवाल कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्रिपद सोडणार नाहीत. मी मुख्यमंत्री आहे, पण मला कोणतेही अधिकार नाही, असा प्रचार करीत ते सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतील, असे या नेत्यांना वाटते.

**काँग्रेसची तयारी :** दिल्लीत गमावलेला जनाधार पुन्हा मिळविण्यासाठी काँग्रेस पक्षानेही आपली तयारी सुरू केली आहे. मागील काही लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जबर मार खावा लागला आहे. काँग्रेसची सारी व्होट बँक आम आदमी पक्षाने काबीज केली. ती परत मिळविण्याची कसरत काँग्रेसला करावी लागणार आहे. दिल्लीत जनसंपर्क यात्रा काढण्याचा कार्यक्रम काँग्रेसने आखला आहे. हरयाणा व दिल्ली या दोन्ही राज्यांत आम आदमी पक्षाशी कोणतीही युती न करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात होणाऱ्या या लढाईचा फायदा भाजपाला मिळेल काय, या लाख मोलाच्या प्रश्नाचे उत्तर विधानसभा निकालातच मिळू शकेल.

**वेध**

**अनिरुद्ध पांडे**

# मोट हाकलतो एक...!

*'येहेरीत दोन मोटा, दोन्हीमधी पानी एक*
*आडोयाले कना चाक, दोन्हीमधी गती एक*
*दोन्ही नाडा समदूर, दोन्हीमधी झीज एक*
*दोन्ही बैलांचे ओढणे, दोन्हीमधी ओढ एक*
*उतरणी चढणीचे, नाव दोन धाव एक*
*मोट हाकलतो एक, जीव पोसतो कितीक...'*

मराठी मातीतल्या ज्येष्ठ कवी बहिणाबाई चौधरी 'शेतीत राबणाऱ्या, मोट ओढून कितीतरी जीव पोसणाऱ्या' बैलांचे किती समर्पक वर्णन करतात पहा. आपल्या विदर्भात या बैलांच्या सणाला 'पोळा' एवढेच म्हणतात. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात मात्र या पोळ्याचा उल्लेख 'बैलपोळा' असा करतात. का कुणास ठाऊक; विदर्भात मात्र पोळा हा बैलांचाच सण याबद्दल वेगळी काही संकल्पना नाही. तिकडे वेगळाही काही पोळा असतो की काय असे वाटते, 'बैलपोळा' ऐकले की...! श्रावणातील ही पिठोरी अमावास्या. या पिठोरीला पोळा सण साजरा करतात. हिंदू परंपरेत हाच मातृदिनही आहे. आज वेगवेगळे आंतरराष्ट्रीय व इंग्रजी मातृदिन साजरे केले जात असल्यामुळे ही परंपरा मागे पडलेली दिसते. या पारंपरिक मातृदिनी ब्राह्मणी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इन्द्राणी, महालक्ष्मी आणि चामुंडा या मातृरूप देवतांची भिंतीवर चंदनाने चित्रे काढून पूजा केली जाते. काही ठिकाणी त्यांच्या पिठाच्या मूर्ती करून त्यांची पूजा केली जाते. नैवेद्यही पिठाचाच असतो, म्हणून या दिवसाला 'पिठोरी अमावास्या' असेही म्हणतात. या मातृदिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान माता, महिलांचा सत्कार अनेक ठिकाणी केला जातो.

आपल्या भारत या कृषिप्रधान देशात शेती हा उद्योग किती महत्त्वाचा हे सांगायला नको. या शेतीतील महत्त्वाचा घटक म्हणजे बैल. नांगरणी, पेरणी, वखरणीपासून धान्याच्या मळणीपर्यंत सगळीकडे कामात येणारा हरकाम्या म्हणजे बैल. या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा हा एक मराठी माणसाचा, मराठी शेतकऱ्याचा सण. त्यातही हा सण साऱ्या महाराष्ट्रात, विशेषतः विदर्भात मोठ्या प्रमाणात साजरा होतो. विदर्भाच्या मध्यप्रदेश आणि तेलंगणा या सीमांवरही हा सण असतो. ज्यांच्याकडे शेती, बैल नाहीत असे लोक घरोघरी मातीच्या बैलांची पूजा करतात. ज्यांच्याकडे बैल आहेत असे शेतकरी या दिवशी बैलांना पूर्ण विश्रांती देऊन त्यांचे कोडकौतुक आणि पूजाअर्चा करतात. त्यांना आंघोळ घालून, चारा देऊन नंतर घरी आणतात. नंतर बैलांच्या खांद्याला हळद लावून शेकतात. पाठीवर नक्षीदार झूल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या, घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा, पायात चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात. त्यांना खायला पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. वर्षभर बैलाचे करणाऱ्या 'बैलकऱ्या'स नवीन कपडे देण्यात येतात. बैलाच्या वर्षभराच्या 'ढोर मेहनती'वर प्रकाश टाकून महाराष्ट्रकवी यशवंत यांनी एकीकडे पोळ्याच्या एका दिवसाच्या कौतुकाचा उल्लेख करून बैलांच्या वेदनेकडेही आपल्या शैलीत लक्ष वेधले आहे,

शिंगे रंगविली, बाशिंगे बांधली, चढविल्या झुली, ऐनेदार
सण एक दिन, बाकी वर्षभर ओझे, मरमर ओढायाचे...

वर्तमानातील शेतीचा विचार केल्यास कित्येक शेतांमधून बैलांचा सहभाग आता कालबाह्य झाला आहे. बैलांकडून केली जाणारी सारीच शेतीकामे आता यंत्रसामग्री करू लागली आहे. एक बैलजोडी पोसणे आता सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडेनासे झाले आहे. त्यापेक्षा यांत्रिकी शेती स्वस्त पडू लागली आहे. तरीही बैलांशिवाय का असेना, बैलांबद्दल कृतज्ञता म्हणून एक संवेदनशील परंपरा म्हणून सर्वच शेतकरी आजही पोळा साजरा करतातच. शेतकऱ्यांसोबतच शेतीशी संबंध नसलेले ग्रामीण व विशेषतः लहान शहरांमधील नागरिक आत्मीयतेने पोळा साजरा करतातच. मोठी गावे किंवा लहान शहरांमध्ये सर्व बैल-जोड्या एकत्र आणून पोळा भरविला जातो. त्यांच्यात स्पर्धा केली जाते. उत्कृष्ट बैलजोडीला स्थानिक संस्था बक्षिसे देऊन सन्मानित करतात. हे सारे आजही उत्साहाने केले जाते आणि पुढेही केले जाईल. जी लहान मुले मोठे बैल हाताळू शकत नाहीत त्यांच्यासाठी दुसऱ्या दिवशी 'तान्हा पोळा' असतो. त्यांचेही एकत्रीकरण, त्यांच्यातही स्पर्धा असते. माती किंवा लाकडाचे बैल घेऊन खऱ्या बैलांप्रमाणेच सारेकाही कोडकौतुक या मुलांचे केले जाते. हा श्रावणाचा शेवटचा दिवस असल्यामुळे श्रावण महिनाभर वेगवेगळी बंधने स्वतःवर जबरदस्ती लादून घेणाऱ्या शौकिनांसाठीही हा 'सुटके'चा दिवस असतो. पोळ्याच्या दुसऱ्या, म्हणजेच करीच्या दिवशी अनेक माणसे बैलाचा भाऊ सांड किंवा वळूसारखे मस्तावलेले आढळून येतात. जशी आता शेतीची यांत्रिकीकरणाकडे वाटचाल सुरू झाली आहे तशीच शेती, शेतकरी यांचीही संपन्न शेतीकडे वाटचाल सुरू व्हावी, मग त्यात बैलांचा सहभागी नसला तरी चालेल. या निमित्ताने एवढेच...!

९८८१७ १७८२९

**कानोसा**

**अमोल पुसदकर**

# कृषी संस्कृतीची जोपासना आवश्यक

'बैलपोळा' हा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. आमच्या देशाची संस्कृती ही ऋषी संस्कृती आहे व कृषी संस्कृती आहे. फार प्राचीन काळापासून आमच्या देशातील लोकांनी शेती कशी करावी, जमिनीची निगा कशी राखावी, जमिनीचा पोत कसा कायम ठेवला पाहिजे, सकस अन्नधान्याची निर्मिती कशी केली पाहिजे याचे तंत्र आत्मसात केले होते. आपल्या देशामध्ये कृषी संस्कृती होती. गाय हा कृषी व्यवस्थेचा आधार होता. गावागावांमध्ये जनावरांकरिता चरण्यासाठी कुरण होते. गाईचे शेण हे खत म्हणून वापरले जात होते. दही, दूध, तूप, लोणी, गोमूत्र या सर्वांचाच जीवन पद्धतीमध्ये वापर होता. गाईपासून मिळणारे बैल हे शेतीसाठी कामात यायचे. गाय, बैल मेल्यावर त्यांना जमिनीत पुरले जायचे व त्यापासून खत मिळायचे. मेलेल्या जनावरांना खाऊन गिधाडे जिवंत होती. हळूहळू सगळे बदलत गेले. देश स्वतंत्र झाला. अधिक दूध उत्पादन झाले पाहिजे म्हणून जर्सी आणि विदेशी गाई आल्या. वास्तविक पाहता या गाई नाहीच. गाईसारखे दिसणारे व दूध देणारे प्राणी आहेत. इतर कुठल्या तरी प्राण्यांच्या संकरापासून यांच्यापैकी अनेकांचे जन्म झालेले आहेत. आमच्याकडे देशी गाईंच्या ६८ जाती होत्या. हळूहळू त्या नष्ट होत आता त्या जवळपास ३८ राहिलेल्या आहेत.

अनेक पिकांचे देशी बियाणे मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेले आहेत. पूर्वी शेतामध्ये देशी वाणाची ज्वारी लावली जायची. त्याची जागा हरितक्रांतीमध्ये हायब्रीड ज्वारीने घेतली. रासायनिक खतांचा उपयोग सुरू झाला. शेतकऱ्यांचे पैसे रासायनिक खतांवर खर्च होऊ लागले. पूर्वी घरचेच बियाणे वापरून शेती पिकविली जात होती. परंतु आता बियाणे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे घ्यावे लागत आहे. बियाणे बाहेरचे, खत बाहेरचे, फवारणीसाठी लागणारे स्प्रे बाहेरचे, शेतकऱ्यांचा पैसा सर्वच गोष्टींसाठी बाहेर जात आहे. सरकारच्या विविध योजनांमुळे दोन रुपये किलो गहू, तांदूळ मिळाल्यामुळे शेतीवर मजुरी करायला जाणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात कमी झाली. शेतीसाठी मजूर मिळेनासे झाले. शेती करणे खर्चिक काम झाले. नुकतीच एक बातमी वाचली; ज्यामध्ये लिहिले होते की, सोयाबीनला समर्थन मूल्यांपेक्षा कमी भावात विकावे लागत आहे. अशा महाग झालेल्या शेतीत पिकणाऱ्या धान्याला जर योग्य भाव मिळाला नाही तर शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी बरेचदा चुकीचे आत्मघातकी निर्णय घ्यावे लागतात. प्राचीन काळी



यापेक्षा कमी उत्पादन असूनही शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत नव्हती; आता सर्व चक्रच बदललेले आहे. शेतकरी हा दुष्टचक्रात सापडलेला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे एजंट आणि तथाकथित बुद्धिवादी अनेक वेळा विविध गोष्टींचा प्रचार करून शेतकऱ्यांना भ्रमित करीत असतात.

अनेक विद्वान लोक देशापुढील समस्या, उद्योगापुढील समस्या सोडविण्यासाठी समोर येतात व आपले बौद्धिक कौशल्य वापरून त्या समस्या सोडवितात. परंतु १४० कोटी लोकांना सकस अन्नधान्य मिळाले पाहिजे यासाठी शेतीकडे एका वेगळ्या नजरेने बघण्याची आवश्यकता आहे. विविध प्रकारांच्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. समाजातल्या अनेकानेक विद्वान लोकांनी शेतीच्या या समस्यांवर विचार मंथन करून उपाय शोधण्याची गरज आहे. विषमुक्त शेती, झिरो बजेट शेती, सेंद्रिय शेती यासारख्या पर्यायांना सरकारने प्रोत्साहन व आर्थिक पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेला माल हा देशातील सर्व भागांत समप्रमाणात विभागला गेला पाहिजे. एखाद्या ठिकाणी गरजेपेक्षा जास्त उत्पादन झाल्यामुळे व त्याची विक्री न झाल्यामुळे ते फेकावे लागते तर देशातल्या एखाद्या भागात ते खूप महाग असते व लोकांना ते मिळत नाही. त्यासाठी शेतमालाची साठवणूक करणारे भांडार गावोगावी असणे आवश्यक आहे. वाहतुकीच्या साधनांची आवश्यकता आहे. रस्त्यांचे जाळे आवश्यक आहे. भारतातल्या सर्वच बाजारातील भाव शेतकऱ्यांना कसे कळू शकतील व शेतकरी घरबसल्या आपल्या मालाचा सौदा कसा करू शकेल यासाठी तंत्रज्ञानाची जोड शेतकऱ्यांना मिळणे जरूरी आहे.

हातातोंडाशी आलेले पीक अनेक वेळा अतिवृष्टीमुळे हातचे चालले जाते. जोपर्यंत पीक घरी पोहोचत नाही तोपर्यंत शेतकऱ्याच्या जीवात जीव नसतो. नुकताच एका गोरक्षणाला भेट देण्याचा योग आला. गोरक्षणाच्या संचालकांनी सांगितले की, कत्तलीसाठी जाणारे सर्व गोवंश आम्ही स्वीकारतो. त्या गोवंशाचे संरक्षण व संवर्धन करतो. त्यांनी जवळपास २०० बैल हे कत्तलखान्यात जाताना वाचविले. त्यांच्याकडे व्यवस्थित त्यांची सेवासुश्रूषा करण्यात आली व त्यांना अगदी नाममात्र शुल्क घेऊन शेतकऱ्यांना देण्यात आले. आज २०० परिवारांना शेतीसाठी बैल देणे खूप मोठे कार्य आहे. अगदी ११०० रुपये नाममात्र घेऊन ते दुभती गाय शेतकऱ्यांना देतात. याने शेतकऱ्याच्या घरी त्याच्या पोरांसाठी दूध पोहोचते. त्याला जर विकायचे असेल तर त्यातून त्याला काही लाभ मिळू शकतो. गाईची सेवा होते. त्यातून गाईबद्दल प्रेम निर्माण होते. ज्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती भाकड गाईंना सांभाळण्याची नसेल तो शेतकरी तशा गाईला पुन्हा गोरक्षणामध्ये आणून सोडू शकतात. भाकड गाईचे शेण, गोमूत्र यापासून अनेक वस्तू बनतात व भाकड गाईचा उपयोग होतो.

आमची संस्कृती ही गाईला 'गोमाता' म्हणणारी आहे. जिने आयुष्यभर आम्हाला दूध दिले, शेतीसाठी बैल दिले, शेणखत दिले तिला तिच्या म्हातारपणी कत्तलखान्यात पाठविणारी मानसिकता आमची नाही. आज अनेक विद्वान शेतकऱ्यांना परवडत नाही म्हणून त्यांनी जर गाईला कसायला विकले तर काय झाले, असा सवाल करतात. गोरक्षण हे अशा लोकांसाठी उत्तर आहे. परंतु उपकाराची परतफेड अपकारांनी करण्याची आमची संस्कृती नाही. आम्ही आयुष्यभर आम्हाला साथ देणाऱ्या बैलाची पूजा करतो. त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. आमच्या सणांच्या मागे मनुष्याने पर्यावरणाशी, प्राण्यांशी जुळावे हाच उद्देश असतो. शहरांमध्ये राहणारे लोक मातीचे बैल बाजारातून विकत घेऊन त्याची पूजा करतात व आम्ही जरी शहरात राहत असलो, आमच्या घरी जरी गाय नसली किंवा शेती नसली तरी आम्ही जे दोन वेळेस अन्न जेवतो त्यामध्ये शेतकऱ्यांची, बैलाची मेहनत आहे, हा संदेश आमच्या लक्षात आणून देण्यासाठी हा बैल पोळा आहे. शेतकऱ्यांना व गोवंशाला कशी मदत करता येईल, याचा विचार शहरात राहणाऱ्या लोकांनी करावा आणि तोच खरा बैल पोळा ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## संस्कृतीशी नाळ जोडणारा 'तान्हा पोळा'

श्रावण अमावास्येला बैल पोळा साजरा करतात. याला पिठोरी अमावास्या असेही म्हणतात. शेतकऱ्यांना उत्साहित करणारा असा हा उत्सव आहे. बैलांविषयी एकप्रकारे कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. नागपूरचे राजे रघुजीराव भोसले-द्वितीय यांनी १८०६ मध्ये मुलांसाठी तान्हा पोळा सुरू केला. ते दूरदृष्टी ठेवून कार्य करीत असत. शेती आणि शेतकरी हे त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय होते. शेतीकडे ते एक व्यवसाय म्हणून नव्हे तर 'परंपरा आणि संस्कृती' म्हणून पाहत होते. एकदा नेहमीप्रमाणे पोळ्याची तयारी करीत असताना मुले



सगळी तयारी कुतूहलाने पाहत आहे, असे त्यांच्या लक्षात आले. मुलांमध्ये शेती आणि शेतकरी यांच्या परंपरा आणि संस्कृतीचा ठेवा पुढील पिढीने जपावा यासाठी लहान मुलांच्या मनात निसर्गाविषयी, शेतीविषयी जवळीक आणि जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून राजे रघुजीराव भोसले-द्वितीय यांनी तान्हा पोळा सुरू केला. आजही विदर्भात सर्वत्र ही परंपरा सुरू आहे. या निमित्ताने लाकडी बैलासोबत मुलांची पारंपरिक वेशभूषा आणि बैल सजावट, छोटा देखावा तसेच त्यातून सामाजिक संदेश यांची स्पर्धा आयोजित करण्यात येते. राजे रघुजीराव भोसले-द्वितीय यांनी ज्या उद्देशाने पोळा सुरू केला ती मुलांना सांगणे आज काळाची गरज आहे. आज युवा पिढीला शेती प्रगतीचे साधन आहे हे शिकवण्याची आवश्यकता आहे. शेतीत केवळ कष्ट करणारे नाही तर शेतीसाठी नैसर्गिक शेण खत आणि गोमूत्रच्या रूपात नैसर्गिक कीटकनाशके देणारे गोधन झपाट्याने कमी होऊ लागले आहे. दररोज गोधनाची मोठ्या प्रमाणात कत्तल होत आहे. गोमाता आणि गोधनाचे पालन, पोषण आणि रक्षण पुन्हा व्हायला हवे. तेव्हाच निर्भेळ आणि शुद्ध, सात्त्विक, पौष्टिक आहार आपल्याला मिळेल. तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने समृद्ध होईल. बैल पोळा म्हणजे शेतकरी आणि बैल यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि आपल्याला त्यांच्या प्रती आपल्या कर्तव्याची आठवण करून देणारा सण आहे.

**प्रांजली ब्रह्मे**/नागपूर

**वाचक पत्रे**

## उत्सवात पावित्र्य राखावे

२७ ऑगस्टच्या तरुण भारतात प्रकाश जोशी यांचे 'राजकारण नको भक्तिभाव हवा' या शीर्षकांतर्गत पत्र वाचण्यात आले. खरंच आपल्या सर्व उत्सवांचे बाजारीकरण झाले आहे. नेमकं आपण काय करतो आहे, याचे भान राहिले नाही, त्यामुळे विकृत विचारसरणीचे लोक त्याचा गैरफायदा घेतात. देवांचे उत्सव साजरे करीत असताना त्या सर्व शक्तिमान भगवंताला काय अपेक्षित आहे, हा विचार ठेवून कार्यक्रमांची रूपरेषा आखावयास पाहिजे. प्रत्येक उत्सव साजरा करण्यामागील शास्त्र काय आहे, हे समाजाला सांगता आले तर उत्सव साजरा करण्याचे उद्दिष्ट सफल होईल; त्याची पावित्र्यता राखता येईल. उत्सवात राजकीय हस्तक्षेप टाळता आले पाहिजे, अन्यथा त्यामुळे वितंडवाद होऊन रंगाचा बेरंग होण्याची दाट शक्यता असते.

**शुचिता देशपांडे**/नागपूर

## कंपन्या मालामाल; शेतकरी दारोदार!

ज्या शेतकरी बंधूंच्या कष्टावर शेतीमाल उत्पादनावर देश चालतो. त्याचीच आज वाईट अवस्था आहे. माल निघतो तेव्हा भाव नसतो. बाजारभाव असतो तेव्हा घरात माल नसतो. आज शेतकऱ्यांना अनुदानापेक्षाही उत्पादन खर्चावर आधारित बाजारभावाची आवश्यकता आहे. अनेकदा आपण वृत्तपत्रातून नकली बियाण्यांवर धाडींच्या बातम्या वाचतो. नकली खतांवर धाड, नकली औषध बाजारात, पुणे येथील रामा फर्टिकेम कंपनीने गुजरातमध्ये उत्पादित डीएपी व १०:२६:२६ दाणेदार माती अमरावती जिल्ह्यात विक्री केल्याचे उघड झाले. यात उत्पादक कंपनी आणि विक्रेत्यांची दिवाळीच झाली. परंतु ज्या शेतकऱ्यांनी ही रासायनिक खते वापरली त्यांना खरंच फायदा होईल का, ज्या शेतकऱ्यांच्या विश्वासावर बियाणे, खते, औषधी कंपन्या चालतात, त्यांनी शेतकऱ्यांचा विश्वासघात का करावा, याबाबत शासनाने अतिशय कठोर पावले उचलण्याची गरज आहे. अनेक उत्पादक कंपन्या विक्रीसाठी विक्रेत्यांना प्रलोभने देऊन विदेशवारीचा संपूर्ण खर्च उचलतात. आजपर्यंत एखादा तरी शेतकरी कंपनीतर्फे विदेशवारीला गेला का? अतिकष्ट करून खर्च करून जास्त उत्पादन घेतले म्हणून फक्त एक श्रीफळ व शाल देऊन सत्कार होतो. विमानवारी, विदेशवारी, पंचतारांकित हॉटेलची मजा मात्र विक्रेते घेतात. शेतकऱ्यांबाबत असाच घोळ रासायनिक औषधांचा आहे. यात सुशिक्षित शेतकरी अनेकदा फसविला जातो. एखाद्या रासायनिक औषधाची किंमत एमआरपी ७५० रुपये आहे, तेच तो ५०० रुपयांतसुद्धा देतो. म्हणजे यात नफा किती आहे ते विक्रेत्यालाच माहीत. यावर शासनाने शेतकरी हितासाठी कठोर निर्णय घेणे आता अत्यावश्यक झाले आहे.

**गणेश अग्रवाल**/९४२०६६१५०६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## पदर कर्तृत्वाचा!

**अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८**

# बॅडमिंटनची तारका अरुंधती पानतावणे



अरुंधती पानतावणे हे नाव वैदर्भीय क्रीडा प्रेमीला माहिती नसेल तर नवलच! बॅडमिंटनपटू अरुंधतीने महिला एकेरीत भारताची नंबर वन खेळाडू ठरण्याचा मान पटकावून, नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. वर्ष २०१० च्या आशियाई खेळांमध्ये महिला चमूचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अरुंधतीला मिळाली. त्या संधीचे सोने म्हणून परदेशी क्लबसोबत करार करणारी प्रथम नागपूरकर खेळाडू ठरली ती अरुंधती! स्टॉकहोम, स्वीडन येथील 'टॅबी बॅडमिंटन क्लब'सोबत २०१० मध्ये तिचा दोन वर्षांचा करार झाला. ही खूप गौरवास्पद बाब होय. त्यामुळे, युरोपमधील बहुतांशी स्पर्धांमध्ये तिला सहभागी होता आलं. शिवाय, झेक प्रजासत्ताक इंटरनॅशनल आणि एस्टोनिया येथे रौप्य पदक तसेच पोलिश इंटरनॅशनलमध्ये कांस्य पदक पटकावले. बहरीन इंटरनॅशनलमध्ये देशासाठी सुवर्णपदक मिळवले. वर्ष २०१७ मध्ये सिनियर नॅशनल सांघिक स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. आज एक उत्कृष्ट खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून नावलौकिक मिळविणारी अरुंधती वैदर्भीय कन्या असल्याने तिचा वैदर्भीयांना निश्चितच अभिमान आहे. हैद्राबादच्या पुलेला गोपीचंद बॅडमिंटन अकॅडमीमध्ये प्रशिक्षक या नात्याने खेळाडू घडविण्याचे कार्य ती उत्साह व तन्मयतेने करते.

क्रीडा शिक्षक व ॲथलेट्स आईवडिलांची मोठी कन्या असल्याने बालपणी ॲथलेटिक्स प्रिय असणाऱ्या अरुंधतीचा बॅडमिंटनप्रती ओढा वाढला तो नवव्या वर्षीपासूनच! तिने सर्वप्रथम वडिलांना नागपूरच्या मेडिकल कॉलेज कोर्टवर बॅडमिंटन खेळताना बघितले अन तिच्या मनात बॅडमिंटनविषयी आकर्षण निर्माण झाले. या खेळात तिचे प्रथम गुरू तिचे बाबाच! कुटुंबात सर्वच सदस्य खेळाडू! असे खेळास पोषक वातावरण! अरुंधतीने बॅडमिंटनमध्ये नागपूरच्या इतिहासात आपले नाव कोरले. मुख्य म्हणजे अरुंधती बालपणी ॲथलेटिक्समध्ये सहभागी होत शंभर मीटर, दोनशे मीटर हर्डल्समध्ये नेहमीच पदके जिंकत असे. त्यामुळे, बॅडमिंटन खेळू लागल्यावरही तिने ॲथलेटिक्स बंद केले नव्हते. परंतु, ती नऊ वर्षांची असताना एकदा दोन्ही स्पर्धांच्या वेळा एकच आल्याने आईवडिलांच्या मार्गदर्शनात तिने बॅडमिंटन स्पर्धेत भाग घेतला. तेव्हापासून आजतागायत ती बॅडमिंटन खेळास समर्पित आहे. भारताला एक उत्तम बॅडमिंटनपटू आणि प्रशिक्षक तिच्या रूपात लाभला आहे.

अरुंधतीने बॅडमिंटन जिल्हा स्पर्धेत अंडर १० मध्ये पहिल्यांदाच भाग घेऊन विजेतेपद पटकावले. मग, मात्र तिने ॲथलेटिक्सला कायमचा राम राम ठोकला. त्यामुळे, कदाचित देश एका उत्तम ॲथलेटिक्सपटूला मुकला, असे म्हणावंसं वाटत असतानाच, देशाला एक उत्तम बॅडमिंटनपटू मिळाली. तिने नागपूरचा आणि विदर्भाचाही नावलौकीक वाढवला. तेराव्या वर्षी अंडर फोर्टीनमध्ये आपले नाव तिने सुवर्णाक्षरात कोरले. वडिलांसोबत नागपुरातील इतरही नावाजलेल्या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तर तिला मिळत होतेच पण, तिची जिद्द, चिकाटी, परिश्रम पुढे जाण्याची महत्त्वाकांक्षा आणि विजिगिषू वृत्ती तिच्या विजयाची पताका फडकवू लागली.

सिंधू, सायना नेहवाल यांच्याशी खेळण्याची चुरस तिला अनुभवता येवू लागली. वर्ष २०११ च्या राष्ट्रीय खेळात तिने सुवर्णपदक पटकावलं. अनेक स्पर्धांचे विजेतेपद पटकावणाऱ्या अरुंधतीसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्याइतकाच शालेय राष्ट्रीय स्पर्धेत मिळवलेला विजय अविस्मरणीय आहे. तिच्या आठवणींच्या कप्प्यात सुरत येथे जिंकलेल्या त्या मॅचचे विशेष महत्त्व आहे कारण, महाराष्ट्रातून अंतिम सामन्यात प्रवेश मिळवलेली ती एकटीच! शाळेचा इतर संघ परतल्यानंतर धैर्याने विजय खेचून आणताना, प्रोत्साहित करण्यासाठी आपलं असं तिथे कोणीच नव्हतं. अशा प्रसंगांनी खेळाडूंचा आत्मविश्वास आणि कणखरपणा वाढत जातो, असे त्या आवर्जून सांगतात.

अंडर सिक्सटीनमध्ये सातत्याने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेत भारताची नंबर एक बॅडमिंटनपटू होण्याचा मान अरुंधती यांनी मिळवला आणि नागपूरची मान क्रीडाविश्वात उंचावल्या गेली. अरुंधतीचा खेळ बघून, तिच्यातील चुणूक आणि प्रतिभा हेरून पी.गोपीचंद यांनी त्यांच्या अकॅडमीत तिला प्रशिक्षणासाठी बोलावले. आपला आदर्श असलेल्या गोपीचंद यांच्या अकॅडमीत जायचे म्हणून ती सुखावली पण, खेळासाठी घरापासून लांब रहावे लागले. खाण्याची बंधने पाळावी लागली. वडिलांनी त्वरित संमती दिल्याने अरुंधती सोळाव्या वर्षापासूनच जणू हैद्राबाद निवासी झाली आहे तरी विदर्भ आणि नागपूरविषयी असलेलं तिचं प्रेम कमी झालं नाही. नागपूरला आल्यावर वेळ मिळाल्यास शाळा-महाविद्यालयास भेट द्यायला तिला आवडतं. हैद्राबादच्या विख्यात स्टेडियममध्ये आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक असलेल्या गोपीचंद यांच्या मार्गदर्शनात अरुंधतीच्या खेळात अनेक तांत्रिक सुधारणा झाल्या. त्याचा उपयोग तिला आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निश्चितच करून घेता आला.

स्वतः खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून योग्य भूमिका निभावत असल्याने आपल्या प्रशिक्षकांविषयी त्यांच्या मनात नितांत आदर आहे. त्या सांगतात 'खेळाडू असताना गोपीचंद सरांकडून मी कसे खेळायचे याचे धडे घेतले. प्रशिक्षक म्हणून कार्य करतांना आता शिकवायचे कसे, हे ही गोपीचंद सरांकडून छान शिकता आले, याचे खूप समाधान वाटते'.

खूपदा खेळाडूंचे नाव होते पण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेले त्यांचे प्रशिक्षक फारसे कोणाला माहितीच नसतात. प्रशिक्षकांचा खेळाडू ते प्रशिक्षक प्रवास, त्यांचा संघर्ष, सुयश याविषयी सर्वांना माहिती मिळावी म्हणून त्यांनी त्यांच्या यु ट्युब चॅनलवर 'क्नो युवर कोच' नावाची सिरीज सुरू केली. त्यातून त्यांचे समाजभान व कृतज्ञता दिसून येते. खेळाडू होणे सोपे नाही. तुम्हाला आहार विहारावर नियंत्रण ठेवावे लागते. संयम, धैर्य आणि कठोर परिश्रमाशी मैत्री करावी लागते.

'दोन वर्षे एकटीने स्वीडनमध्ये राहण्याचे धैर्य मला खेळानेच दिले. खेळाडू म्हणून जगताना कळत नकळत जे संस्कार होतात, त्याचा आयुष्यात फार मोठा फायदा होतो. जीवनविषयक सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो. पराभव पचविण्याची ताकद मिळते. एकट्याने निर्णय घेण्याची क्षमता वाढते. शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी खेळाचा फायदा होतो. त्यामुळे, प्रत्येकाने एकतरी खेळ खेळायला हवा, असं त्या तरुणांना आवाहन करतात.

आयुष्याच्या वळणावर एक गुलाबी थांबा अरुण विष्णू या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटूच्या रूपात त्यांना लाभला. केरळ आणि महाराष्ट्र असे भारतीय ऐक्याचे प्रतीक होऊन बॅडमिंटनपटू घडविण्यात आपले बहुमोल योगदान देत आहेत. त्यांच्या मुलानेही खेळाडू व्हावे, ही त्यांची मनीषा आहे. पण, खेळ निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला असेल, असे त्या म्हणाल्या.

नागपूरमध्ये खेळासाठी सर्व सोयींनी युक्त, सुसज्ज, अधिक सकारात्मक वातावरण तयार झाल्यास आपल्या इथले खेळाडू निश्चितच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करू शकतील, असा त्यांना विश्वास आहे. नागपूरसह विदर्भातील खेळाडूंसाठी काहीतरी करावे ही भावना त्यांच्या मनात सतत असते. त्यामुळे, त्यांनी एक महिन्याचे उन्हाळी बॅडमिंटन प्रशिक्षण शिबिर नागपूर येथे घेतले.

समाजभान जपत त्यांनी काही विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा भार उचलला. अनेक समाजसेवी संस्थांशी त्या जुळल्या आहेत. ओएनजीसी मध्ये मॅनेजरपदी कार्यरत, खेळाडू, इवल्या पंखात बळ भरणारी एक आई, सासर माहेर आणि २०१८ पासून कोच म्हणून सुरू केलेला प्रवास यशस्वी करतेय हे खरच कौतुकास्पद आहे. ती प्रशिक्षण देत असलेल्या अंडर १६ गटात प्रशिक्षण घेणाऱ्यांची आशियाई खेळांमध्ये वर्णी लागल्याचा आनंद एक प्रशिक्षक म्हणून तिच्यासाठी खास आहे. खेळासोबतच तिला पर्यटनाची आवड आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही आघाड्यांवर आपला ठसा उमटवणारी ही नागपूरकर कन्या आपल्या तंत्र आणि कौशल्याच्या बळावर हा यशस्वी प्रवास करू शकली. नुकताच २९ ऑगस्टला राष्ट्रीय क्रीडा दिवस आपण साजरा केला. त्यानिमित्ताने आणि २ सप्टेंबरला असलेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने अरुंधतीला खुप शुभेच्छा!

## गजाननवाणी

### तुझ्या मना मी जाणितले



**वर्षा देशपांडे/ ८४२११ ७८००१**

मुंडगावच्या बायजाचे बालपणीच लग्न झाले. वयात आल्यावर तिला सासरी पाठवण्यात आले. जामात षंढ होता. ऐन तारुण्यात असलेल्या बायजावर तिच्या दिराची नजर गेली. पण, बायजा त्याला पित्याप्रमाणे मानत होती. एकदा तो रात्री तिच्याकडे आला आणि तिच्या अंगावर हात टाकणार होता. महाराजांची कृपा बायजावर होती. त्या क्षणी दिराचा मुलगा माडीवरून पडला. कपाळाला खोच पडली. रक्त येऊ लागले. दिराला आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला. त्यानंतर, मुंडगावाला बायजाला नेण्यात आले. बायजाचे आई-वडील तिचे भविष्य विचारण्यासाठी शेगावला तिला घेऊन गेले. त्यावेळी महाराज म्हणाले,

***जेवढे पुरुष जगतात, तेवढे असती हिचे तात,***
***उगे न पडा फंदात, लग्न हिचे करण्याच्या***

बायजा आनंदली. ती महाराजांची भक्त झाली. मुंडगावच्याच पुंडलिक नावाच्या महाराजांच्या भक्तासोबत ती शेगावच्या वाऱ्या करू लागली. तिच्या आणि पुंडलिकाच्या नावाची गावात चर्चा होऊ लागली. हे भक्तीचे ढोंग करतात. यांचे मन विषयासक्त आहे, असे बोलू लागले. मात्र, बायजा आणि पुंडलिक यांचे मन निर्मळ होते. एकदा बायजा, तिचे आई(भूला)-वडील आणि पुंडलिक दर्शनाला आले असता,

***बोलू लागले दयाघन, की बायजा तुझी बहीण,***
***पूर्वजन्मीची पुंडलिका लोकं निंदा जरी करिती,***
***तरी अंतर न द्यावे इजप्रती, दोघे मिळून करा भक्ती,***
***सच्चिदानंद हरीची, भूले आपुल्या पोरीस,***
***लावू नको भलता दोष, ही बहिण-भाऊ आहेत,***
***मुळीच पूर्व जन्माची***

बायजाच्या पाठीशी ते उभे राहिले. स्त्रियांविषयी अत्यंत ममत्व आणि व्यापक दृष्टिकोन महाराजांचा होता, हेच यावरून दिसतं. साळूबाई नावाची स्वयंपाकीण मठामध्ये होती. तिला महाराजांनी मुक्तीचा मार्ग दाखविला. गजाननवाणी झाली

***एके दिनी, ऐशा परी वदले वाणी,***
***डाळ पीठ घेऊनी, स्वयंपाक करी अहोरात्र***
***जे येतील तयांना, साळू घाल भोजना,***
***येणेच तू नारायणा, प्रिय होशील निःसंशय***

नागपूर येथे गोपाळ बुटीच्या आग्रहास्तव महाराज आले. अत्यंत वैभव संपन्न तेथील जीवन होत. मात्र, महाराजांना शेगावातच राहायचं होतं. बुटीला महाराजांना नागपूरलाच ठेवावे, असे वाटत होते. शेगावच्या लोकांना दर्शनासाठी बंदी होती. मग, मात्र स्वतः हरी पाटील त्यांना शेगावला घेऊन जाण्यास आले. भोजन करून महाराज निघाले त्यावेळी, बुटीच्या पत्नीने महाराजांना नमस्कार केला.

***तिने केली विनवणी, महाराजांचे चरणी,***
***माझा हेतू मनीच्या मनी, बसू पाहतो गुरुराया***
***तई महाराज बोलले, तुझ्या मना मी जाणीतले,***
***ऐसे म्हणून लाविले, कुंकू तिच्या कपाळास***
***आणखी एक पुत्र तुला, परम सद्गुणी होईल भला,***
***अंती जाशील वैकुंठाला सौभाग्यसह बाळे तू***
***असा आशीर्वाद देऊन, निघते झाले दयाघन***

बुटीने महाराजांना दुराग्रह करून ठेवून घेतले तरी मात्र त्याच्या पत्नीविषयी महाराजांच्या मनात यत्किंचितही राग नव्हता. स्त्रियांविषयी सदैव त्यांच्या मनात वासल्य राहात असे. मुख्य म्हणजे त्यांच्या मनात काय आहे, हे महाराजांना बरोबर कळायचे.

## ब्रॅण्ड स्टोरी

**निकिता गावंडे /९९७०६६३८१३**

# जिभेला गुलाम बनवणारा शहंशाह...



'अगं आई, काहीतरी मस्त कर ना खायला...''साहिल, अरे दुपारच्या जेवणानंतर आता काय मस्त हवंय तुला?''पोटातल्या कावळ्यांसाठी नकोय गं! पण, जिभेवरील टेस्टबड्सला आवडेल असं काहीतरी...''बस दो मिनिट' आई नाटकी आवेशात म्हणाली. 'आई, मॅगी नकोय मला!' ङ्गचला तयार आहे फर्स्ट क्लास भेळ,'आई लगेच भेळ घेऊन आलीसुद्धा आणि सोबत आलू भुजिया अपरिहार्यपणे होतीच. 'तुला सांगतो नयना या भुजिया शेवेला तर दुसरा पर्यायच नाही,' बाबा शेवेचा घास घेता घेताच म्हणाले. ङ्गनयना अगं, भारतीय माणसांच्या जिभेची चव केवळ दोनच व्यक्तींना परफेक्ट कळते. एक म्हणजे त्याची आई आणि दुसरा हल्दीराम ब्रॅण्ड!''खरंय, तुझं वहिनी,' नयना हसत म्हणाली. 'हे बाकी अगदी खरंय...उगाच नाही दोन पैसे किलोच्या दराने बिकानेरच्या गल्ल्यांमध्ये भुजिया विकणारा मुलगा आज ६३ हजार करोडचा बिझनेस करणारा एक लीडिंग भारतीय ब्रँड आहे,'बाबांनी माहिती सांगायला सुरुवात केली. ङ्गमध्यंतरी भुजिया बॅरोन नावाचे एक सुंदर पुस्तक माझ्या वाचनात आले होते. त्यात हल्दीरामची प्रेरणादायक कहाणी मला मिळाली.''चला, आजच्या चर्चेसाठी एक सुंदर विषय मिळाला,'आजी म्हणाली. 'चला तर ऐका, एका धडपड्या मारवाडी मुलाची कहाणी! गंगाबिशन अग्रवाल नावाचा एक अकरा वर्षांचा मुलगा होता. त्याची आई त्याला लाडानं हल्दीराम म्हणायची. त्या काळातील प्रथेनुसार, अकरा वर्षांच्या वयात त्याचा विवाह झाला. कुटूंबाची जबाबदारी घेण्यासाठी त्याचे कोवळे खांदे तयार होऊ लागले. वडीलोपार्जित असलेल्या छोट्याशा भुजियाच्या दुकानात त्याने लक्ष घालायला सुरुवात केली. हल्दीरामचे पणजोबा तनसुखदास हे एक छोटेसे व्यापारी होते. त्यांचे पुत्र भीखाराम अर्थात हल्दीरामचे आजोबा यांच्यावर संपूर्ण कुटूंबाची जबाबदारी होती. एकदा मुलांची आत्या भिखिबुआ माहेरी आली. तिने आपल्या सासरकडील स्पेशालिटी असलेला भुजिया नावाचा पदार्थ आपल्या लाडक्या भाच्यासाठी केला. पुढे ती आपल्या गावाला परत गेल्यावर भिखाराम व त्यांच्या पत्नीने मुलांसाठी म्हणून हौसेने हा पदार्थ शिकून घेतला. गरज म्हणून पुढे तो भुजिया बाजारातील दुकानात विकण्यास तयार सुरुवात केली. सुरुवातीला वर्तमानपत्राची पुंगळी करून त्यातून जाडसर भुजिया पाडण्यात येत असे आणि यातूनच बीजारोपण झालं ते भारतीय जिभेवर राज्य करणाऱ्या एका साम्राज्याचं! बिकानेरच्या गल्ल्यांमध्ये लहानसा हल्दीराम दोन पैसे किलो दराने भुजिया विकायला लागला. थोडीफार आवक होऊ लागली होती. संसाराचा गाडा रेटायला तेवढीच मदत. लहानपणापासूनच हल्दीरामला बाहेर उंडारण्यापेक्षा स्वयंपाकघरात आजी आणि आईच्या मागे लुडबुड करणे जास्त आवडायचे. हळूहळू पीठ मळणे, भाज्या कापणे अशी कामं तो आवडीने करू लागला. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात या उक्तीप्रमाणे समस्त भारतीयांना वेड लावणाऱ्या या चवसम्राटाने मसाल्यातील बारकावे समजून घेण्यास सुरुवात केली. लहानपणापासूनच उद्योगी प्रवृत्तीच्या हल्दीरामच्या अंगात भिनलेली प्रयोगशीलता त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. एकदा एक भन्नाट आयडिया त्याच्या डोक्यात आली. मसूर डाळ म्हणजे राजस्थानी लोकांचा जीव की प्राण! एकदा हल्दीरामने भुजियाच्या मिश्रणात बेसनाच्या बरोबरीने मसूर डाळ मिसळली. वेगळ्या चवीचा हा प्रयोग सगळ्यांना आवडला. पण, हल्दीराम म्हणजे पट्टीचा खवय्या! त्याच्यानुसार कुरकुरीतपणा हा भुजियाचा आत्मा! तेव्हा आपण बनवलेली भुजिया आणखी कुरकुरीत करण्यासाठी त्याने अनेक प्रयोग केले. कधी पीठ पातळ भिजव तर, कधी लहान छिद्रांच्या साच्यातून भुजिया तयार कर. खास बारीक जाळीचा साचा तयार करण्यासाठी तर त्याने बिकानेरमधील सगळ्या लोहारांची दुकानं पालथी घातली आणि आपल्या आवडीनुसार साचा तयार करून घेतला. आणि, शेवटी अनेक प्रयोगांनंतर तयार केलेली भुजिया खाऊन बघताच जणू ब्रह्मानंदी टाळी लागल्याचा आनंद हल्दीरामला झाला आणि जन्म झाला एका सुंदर, गुटगुटीत नव्हे तर कुरकुरीत, चवदार बहुगुणी भुजियाचा! कहानी तो लंबी है...'

# डोळ्यांखाली काळी वर्तुळं? अशी करा दूर!

सुंदर डोळे चेहऱ्याच्या सौंदर्यात भर घालतात. डोळ्यांखाली काळी वर्तुळं तयार होणं, ही समस्या आता तशी सामान्य झाली आहे. महिलांसोबतच पुरुषांनाही या समस्येला तोंड द्यावं लागतं. बऱ्याच जणी मेकअपच्या माध्यमातून, ही वर्तुळं लपविण्याचा प्रयत्न करतात. पण, काही सोप्या उपायांनी पुरूष असोत की महिला, अतिशय सहजपणे ही वर्तुळं दूर करून, त्वचा चमकदार करता येते.



ताण-तणाव, अपुरी किंवा अर्धवट झोप, डिहायड्रेशन आणि लाईफस्टाईल डिसऑर्डरमुळे डोळ्यांखाली काळी वर्तुळं तयार होतात. त्यांना दूर करण्यासाठी कच्चा बटाटा फायदेशीर ठरतो. भाजीसाठी बटाटा चिरतानाच एक मोठा तुकडा किसून घ्या. हाताने दाबून त्याचा रस काढून, डोळ्यांखालच्या वर्तुळांवर लावा. नियमित हा उपाय केल्यास हमखास फायदा मिळतो. टि-बॅग थोडा वेळ पाण्यात भिजवून ठेवा. नंतर तिला फ्रिजमध्ये ठेवून थंडगार करून घ्या. अशा टि-बॅग डोळ्यांवर ठेवा. यामुळे, डोळ्यांना थंडावा मिळून काळी वर्तुळं दूर होतील.

डोळ्यांखालची काळी वर्तुळं दूर करण्यासाठी काकडी हा एक चांगला उपाय आहे. यासाठी, काकडी थोडा वेळ फ्रिजमध्ये ठेवा. त्याच्या चकत्या करून डोळ्यांवर १५ मिनिटांसाठी ठेवा. हा एक प्रभावी उपाय असून लवकर डार्क सर्कल्सपासून सुटका होऊ शकते. बदामाचे तेल ई जीवनसत्त्वाचा चांगला सोर्स असून, झोपण्यापूर्वी या तेलाने त्वचेवर हलकी मालीश करावी. नियमितपणाने हा उपाय केल्यास हळूहळू डोळ्यांखालची काळी वर्तुळं फिकट होतील. शिवाय, दररोज किमान ८ तासांची झोप, भरपूर पाणी पिणे आणि उन्हात जाण्यापूर्वी चेहऱ्यावर सनस्क्रीन लावणे हे बदल आपल्या जीवनशैलीत आवर्जून करायला हवेत.

## गझल आरस्पानी

**गझलनंदा / ८४२२०८९६६६**

# शेपूट शिंग नसलेल्या बैलांचा हा तर पोळा

# नियम आणि संकेत



मराठी गझल लिहीत असताना जे नियम आहेत, ते या लेखामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे. सुरेश भट साहेबांनी गझलेची बाराखडी सांगितली. त्याचाच आधार घेऊन आपण गझल लिहिण्याचा प्रयत्न करतो. मात्र, आज काही वेगळे प्रवाहसुद्धा बघायला मिळतात. मग ते काफिया किंवा स्वरचिन्ह या बाबतीत असू शकतात. मुळात काफिया किंवा यमक हा गझलेचा प्राण आहे. मात्र, याच क्षेत्रात काही नवे प्रयोग केलेले आढळतात. आता काफिया म्हणजे काय? आधीच्या लेखात मी सांगितले आहे. परंतु, आत्ताही त्याचा ओघवता उल्लेख करते. शेवटचे अक्षर किंवा अक्षरसमूह कायम ठेवायचे. त्याआधीच्या अक्षराचा स्वर कायम ठेवायचा, ते स्वरचिन्ह! म्हणजेच अलामत! गझलेच्या मतल्यात दोन्ही मिसऱ्यात काफिया असतो आणि नंतरच्या सर्व शेरात फक्त सानी मिसऱ्यात असतो. याला शुद्ध किंवा निर्दोष काफिया म्हणतात.

आजकाल वेगवेगळे कवाफी घेणं हा एक प्रकार सुरू आहे. यात, स्वरकाफिया हा एक प्रकार आहे. स्वरकाफियामध्ये अंतिम व्यंजनाचा विचार न करता, फक्त त्या व्यंजनाला लागलेला स्वर बघितला जातो. त्यानुसारच, सर्व कवाफी तयार होतात.

उदाहरणार्थ - कळणार नाही.
यात कळणार -काफिया
आणि नाही - रदीफ आहे

नेहमीप्रमाणे शुद्ध काफिया असेल तर कळणार/वळणार/टळणार/फळणार/पळणार याप्रमाणे शब्द यायला हवेत. कारण, स्थिर अक्षर समूह आहे. 'ळणार' त्यामुळे क व ट फ प यात असलेला अ हा स्वर-स्वरचिन्ह आहे. अर्थात मतल्यात उला मिसऱ्यात कळणार असेल आणि सानीमध्ये बसणार असेल, तरीही ठीक आहे. पण, हेच जर स्वर काफिया घ्यायचा असेल तर इतर कवाफी कसे घेणार?

बघा,
कळणार नाही, बसलाच नाही, स्मरणात नाही वगैरे! इथे काफियाचे स्वर अ अ आ अ असे कायम आहेत म्हणजे हा स्वरकाफिया ! अशावेळी अंतिम अक्षराचे बंधन इथे नसते. तुम्ही कोणतेही शब्द घेऊ शकता. किंवा,

याद/वाट/पार/मात
स्वरचिन्ह आ स्थिर स्वर अ
माझी/झाली/काही/दाटी
स्वरचिन्ह आ स्थिर स्वर ई, असे शब्द घेतले जातात. मित्रांनो एक गोष्ट लक्षात घ्या की,

इथे स्वर सारखा असला तरी शब्दमाधुर्य नाही. जे शुद्ध काफियात म्हणजे उदा. कळणार/वळणार/ पळणार/टळणार किंवा झाली/आली/वाली यात आहे. इथे बरेचदा उर्दू गझलांचा दाखला दिला जातो. हे सर्व तंत्र विस्तारभयास्तव उलगडून दाखवणे तसे कठीण आहे.

एक शेराचे उदाहरण देते.

'तुला सांगायचे होते मला जे काल ओठांनी
कसा ओठांवरी लिहिला तराणा आज ओठांनी'

यात स्वरकाफिया आहे. काल/आज... आता हाच शेर शुद्ध काफियात बघू या !

'तुला सांगायचे होते मला जे काल ओठांनी,
कसा ओठांवरी लिहिला तराणा लाल ओठांनी'

काल आज, साज, नाच, टाळ, पार असे कवाफी बरे वाटतील की, काल, लाल, शाल, चाल, गाल हे बरे वाटेल? तुम्हीच ठरवा ! अर्थात गझल लिहिणाऱ्यांनी याचा विचार करावा की, काय बरे वाटते? मराठी गझलेत शुद्ध काफिया बरा वाटतो की स्वर काफिया?

आता याचाच दुसरा प्रकार म्हणजे सौती काफिया किंवा सवती काफिया! आपली सर्व व्यंजने क च ट त प या वर्गात आहेत. त्या प्रत्येक वर्गात ५ अक्षरे आहेत. उदा. क ख ग घ ङ यातील क ख आणि ग घ हे समानधर्मी आहेत. तर ङ हे अक्षर क वर्गात अनुस्वाराचे काम करतो. प्रत्येक वर्गात अशी जोडीची अक्षरे आहेत. म्हणजे, एकूण कख/गघ/चछ/जझ/टठ/डढ वगैरे! तथ/दध/पफ/बभ अशी जोडीची अक्षरे आहेत. याचे एक उदाहरण देते.

'मज मोजता न आले स्वप्नात अंक होते
छाटून टाकलेले माझेच पंख होते'

इथे क आणि ख अशी अक्षरे आहेत. शेराचा अर्थ आपल्याला कळतो. पण, हाच शेर...

'मजला कधी न कळले वाऱ्यास डंख होते
छाटून टाकलेले माझेच पंख होते'

उदाहरण म्हणून हे दोन शेर दिलेत. या शेरातील अर्थाकडे न बघता केवळ वर्ण बघा. क/ख बरा वाटतो की ख /ख? शुद्ध काफिया न घेणारे, स्वर काफिया किंवा सवती काफियाच घेणारे लोक नेहमीच सांगतात की, अशी सूट घेतल्याने आम्हाला लेखनाचं आभाळ मोकळं आहे. आम्ही खूप लिहू शकतो. पण, ते करताना कुठे नादमाधुर्याची गळचेपी तर होत नाही ना? हे बघण्याची मोठी गरज आहे.

आणखी एक महत्त्वाचे ! ण आणि न या अक्षरांबाबत तर बोलायलाच नको. अनेक लोक सहजपणे ही दोन अक्षरे काफियातील अंतिम वर्ण म्हणून घेतात. ही अक्षरे अनुक्रमे ट वर्ग आणि त वर्गातील अनुस्वार आहेत. असे घेऊ नये मग, आम्हाला कवाफी सापडत नाहीत, असं सर्रास सांगितलं जातं. अशावेळी न असलेलं ६ कवाफी असतील तर पाचच शेरांची गझल लिहा . ण चे पुन्हा पाच शेर घ्या. दोन गझला होतील. पण, मला ११ शेरांची गझल लिहायची आहे. या अट्टाहासापोटी ण आणि न एकाच तऱ्हेने वापरला जातो. पण, हे सर्वसंमत नाहीत. मराठी गझलेत शुद्ध काफिया घ्यावा, असं माझं मत आहे. मतमतांतरे असू शकतात पण, गर्भश्रीमंत मराठी भाषेत यमक मिळत नाही, असं म्हणणं म्हणजे आम्हीच अभ्यासात कुठेतरी कमी पडतोय, इकडे लक्ष वेधावे लागेल. कारण, श्लोक श्लोकच असतो, अभंग अभंगच असतो, ओवी ओवीच असते. तशीच गझल ही गझलच असायला हवी. गझलेसारखे काहीही असत नाही. एकतर गझल असते किंवा गझल नसते.

आज एवढेच! बैलपोळा आणि तान्हा पोळा याच्या सर्वांना शुभेच्छा ! आता नेहमीप्रमाणेच माझीही एक गझल !?

### बैलांचा पोळा

पाहिला कधीही नाही कोणीच शुकाचा डोळा,
या समाजात कोणाचा घेतला कुणी धांडोळा
विश्वास उडाला होता रक्ताच्या नात्यावरूनी,
झालेल्या जखमांवरती मग मीठ पुरेसे चोळा
मतमतांतरे झालेली मत नाही ज्यास स्वतःचे,
गडगडतो गडवा तेथे जो बुडाशीच वाटोळा
घेतले दान ज्ञानाचे जर गुरूपासुनी होते,
त्या गुरूचाच शिष्याने का केला चोळामोळा
का मान हलविती येथे नुसत्याच इशाऱ्यावरती,
शेपूट शिंग नसलेल्या बैलांचा हा तर पोळा

# राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा आ.प्रकाश सोळंके यांना पुरस्कार

## विधान भवनात मंगळवारी राष्ट्रपतींच्या हस्ते होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ सप्टेंबर**



राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०-२१ करिता महाराष्ट्र विधानसभा उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी माजलगाव मतदार संघाचे भाग्यविधाते तथा लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांची निवड झाली असून दि. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते आ. सोळंके यांचा विधान भवन मुंबई येथे सन्मान करण्यात येणार आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांना सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण या पुरस्कारांसंदर्भात पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र विधानसभा उत्कृष्ट भाषण पुरस्कार माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांना राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान आ. प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल चा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे मतदार संघात तसेच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# धारूर महादुर्ग किल्ल्यातील ऐतिहासिक भिंतींचे ढासळणे

## गुत्तेदाराच्या निकृष्ट कामामुळे सध्या परिस्थिती चिंताजनक

**पुरातत्व विभागाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता - भिंतींमध्ये वापरलेली काळी माती कारणीभूत**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२ सप्टेंबर**



धारूर येथील ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या संरक्षक भिंतींचे डागडूचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे भिंतींमध्ये ढासळण्याची मालिका सुरू झाली आहे. गुत्तेदाराने तीन वर्षांपूर्वी केलेल्या दुरुस्तीच्या कामात काळ्या मातीचा वापर केल्याने भिंती फुगून ढासळत आहेत. यापूर्वी तीन भिंतींमुळे संकटीत झाला होता, आणि आता तीन दिवसांपूर्वी एक अधिक भिंत ढासळली आहे. या संकटामुळे स्थानिक दुर्गप्रर्मी सदस्यांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे की पुरातत्व विभाग या ढासळलेल्या भिंतींचे पुनर्निर्माण कधी करणार. किल्ल्याच्या ऐतिहासिक महत्त्वाकडे लक्ष वेधून घेताना, स्थानिक नागरिकांचा संताप वाढत आहे, आणि यावर तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

ऐतिहासिक वैभवाचे साक्षीदार असलेल्या किल्ले धारूरच्या महादुर्ग किल्ल्याच्या डागडुजीसाठी शासनाकडून ७ कोटींचा निधी मंजूर झाल्यानंतर डागडुजीचे काम हे पुरातत्व विभागाने संभाजीनगर येथील गायत्री कंन्ट्रक्शनला दिले होते. हे काम केल्यानंतर कामाच्या दुरुस्ती व देखभालीची ५ वर्षांची जबाबदारी गुतेदाराकडे होती. परंतु पाच वर्षे पूर्ण होण्याआधीच किल्ल्याच्या भिंतीमध्ये पावसाचे पाणी जावून माती फुगल्याने ढासळत आहेत.किल्ले धारूरच्या महादुर्ग किल्ल्याच्या डागडुजीसाठी शासनाने ७ कोटींचा निधी मंजूर केला होता, पुरातत्व विभागाने गायत्री कंन्ट्रक्शनला काम दिले. काम पूर्ण झाल्यानंतर गुत्तेदाराकडे ५ वर्षांची देखभाल व तंत्रज्ञानाची जबाबदारी होती. मात्र, पाच वर्षांपूर्वीच किल्ल्याच्या भिंतींमध्ये पावसाचे पाणी जाऊन माती फुगण्याने भिंती ढासळू लागल्या आहेत.जर ढासलेली भिंत वेळीच पुनर्निर्माणासाठी पुरातत्त्व विभागाने लक्ष दिले नाही, तर इतर भागांचेही ढासळणे सुरू होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत, पुरातत्त्व विभागाच्या सहाय्यक संचालकांचे धारूर किल्ल्याकडे दुर्लक्ष असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.पुरातत्व विभाग या ढासळलेल्या भिंतींचे पुनर्निर्माण कधी करणार. किल्ल्याच्या ऐतिहासिक महत्त्वाकडे लक्ष वेधून घेताना, स्थानिक नागरिकांचा संताप वाढत आहे, आणि यावर तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

# रस्ता प्रकरणी मंडळ अधिकाऱ्याची मनमानी

## १३ दिवसा पासुन अहवाल गुलदस्त्यात

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ सप्टेंबर**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी अंतर्गत हनुमान वस्तीवरील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांनी मंडळ अधिकारी सुहास डोरले यांची नियुक्ती केली होती.या प्रकरणी मंडळ अधिकारी हे बणवाबणवी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभुल करीत आहेत.



केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील हनुमानवस्ती साठी तत्कालीन तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे रस्ता देण्याऐवजी या रस्त्याला विरोध करणाऱ्यांशी संगणमत करून मंडळ अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत.तहसिलदार यांचे कडुन पुढील तारीख घेण्यासांठी मंडळ अधिकारी यांनी १६ ऑगस्टठं रोजी प्रत्यक्ष घडलेल्या कामकाजाचा अहवाल सादर करणे गरजेचे आसतानाही मंडळ अधिकारी यांनी १५ दिवस झाले तरी अद्याप अहवाल तहसीलदार यांना सादरच केला नाही.यावरुन मंडळ अधिकारी हे आपल्या कर्तव्यात कसुर करीत असल्याचे सिद्ध झाले आहे. अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन नकरता मनमानी कारभार करुन अधिकाऱ्याच्या आदेशाला केराची टोपली दाखवित आहेत.

**१५ दिवसापासून अहवाल सादर होईना**

वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरुन १६ ऑगस्ट रोजी नायब तहसिलदार आशा वाघ,मंडळ अधिकारी सुहास डोरले,तलाठी उत्रेश्वर घुले,भुमी अभिलेखचे रविंद्र विभुते यांनी हनुमान वस्ती येथे येऊन केलेल्या कामकाजाचा अहवाल तहसीलदार यांना सादर करणे आवश्यक आसताना अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याची माहीती तह.जमा-२ च्या श्रीमती कावळे मॅडम व तहसिलदार सचिन देशपांडे यांनी दिली.तर मंडळ अधिका-यांशी संपर्क साधला आसता तरप्रकरणी मंडळ तहसिल कार्यालयाला अहवाल सादर केल्याची ते खोटी माहीती देत आहेत.

**मंडळ अधिकारी बदलण्याची मागणी**

उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी सांगुनही मंडळ अधिकारी सुहास डोरले हे राजकीय दबावापोटी अतिक्रमणाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांशी संगणमत करुन त्यांना अभय देऊन वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता कर्तव्यात कसुर करीत आहेत. अधिकाऱ्यांची दिशाभुल करीत आहेत,त्यामुळे या प्रकरणी त्यांच्या ऐवजी दुसऱ्या मंडळ अधिकाऱ्याची नियुक्ती करुन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात यावे किंवा तत्कालीन तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे नदीच्या बाजुने रस्ता उपलब्ध करुन देण्याची मागणी उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांचेकडे हनुमान वस्ती येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# क्रॉप इन्शुरन्स पवर नुकसानीची तातडीने नोंदणी करा

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आ.संदीप क्षीरसागरांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ सप्टेंबर**

जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची माहिती बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी तातडीने क्रॉप इन्शुरन्स पवर करावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

संपूर्ण बीड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून सतत जोरदार पाऊस सुरू आहे. झालेल्या पावसाने जिल्ह्यातील सर्व जलसाठे जवळपास संपूर्ण भरलेले आहेत. परंतु या पावसामुळे शेतातील सर्व प्रकारच्या पिकांचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. सर्व शेतकरी बांधवांनी पिक विमा भरला आहे. परंतु विमा मिळण्याकरिता झालेल्या नुकसानीची माहिती ७२ तासांच्या आत क्रॉप इन्शुरन्स पवर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती क्रॉप इन्शुरन्स पच्या माध्यमातून विमा कंपनीकडे नोंदवावी जेणेकरून पीक विमा मिळेल. असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

**पुराचा धोका असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन**



मागील काही तासांपासून बीड जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील अनेक नाले, ओढे व नदी दुथडी भरून वाहत आहे. दरम्यान बीड शहराजवळील बिंदुसरा प्रकल्पाचे तळे पूर्णपणे भरले असून पुढील काही तास पावसाचा जोर असाच राहील्यास नदीने धोकादायक पातळी ओलांडल्यास नदीकाठच्या नागरिकांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी सतर्क व सावध रहावे तसेच काहीही अडचण आल्यास आपत्कालीन विभाग ०२४४२-२९९२९९ व आ.क्षीरसागर यांचे स्वीय सहायक गणेश भरनाळे, संदीप नवले, अशोक चौरे यांच्या मो.नं.७७९८९७३१९९, ९७६६२७२७२४, ८१४९७७५७७७ या संपर्क क्रमांकावर तातडीने संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

**तांत्रिक अडचणींबाबत प्रशासनाने काळजी घ्यावी**

बर्याच वेळा पीक पाहणी, नुकसानीची नोंदणी करताना संबंधित पोर्टल तसेच पवर सर्वर डाउन तसेच इतर तांत्रिक अडचणी शेतकरी बांधवांना येत असतात. नुकसानीची माहीती देण्याचा कालावधी हा ७२ तासांचा आहे. या अनुषंगाने प्रशासनाने विमा कंपनी व संबंधित कार्यान्वित पोर्टल कंपनी यांच्याकडे समन्वय साधून तत्सम प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत. याची काळजी घेण्याच्या सुचना आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# नुकसानीची पुर्व सुचना ७२ तासाच्या आत विमा कंपनीला द्यावी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ सप्टेंबर**

आपण खरीप पिकविमा भरला असेल आणि स्थानिक नैसर्गिक , (गारपीट, अतिवृष्टी,भुस्खलन, विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी, विज कोसळल्यामुळे लागणारी व काढणी पश्चात नुकसान भरपाई (गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस व बिगर मौसमी पाऊस या बाबी अंतर्गत सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकाचे काढणीनंतर १४ दिवसा पर्यंत झालेल्या नुकसानीची पुर्व सुचना ७२ तासांच्या आत

1)Crop insurance -pp (H«$m°n BÝewaÝg n qbH$)

https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central

२)१४४४७ टोल फ्री क्रमांक

३) बँक

४)पिक विमा कार्यालय

५) तालुका कृषी कार्यालयात

वरील माध्यमातून पुर्व सुचना आपण कंपनी ला कळवु शकतो....

क्रॉप इन्शुरन्स प वरुन तक्रार कशी करावी?

१) आपली भाषा निवडा

२) नोंदणी खात्याशिवाय काम सुरू ठेवा

३) पिक नुकसान पर्याय निवडा

३) पीक नुकसानीची पूर्वसूचना या पर्यायावर ती क्लिक करून तुमचा मोबाईल नंबर टाका, मोबाईल नंबर वरती OTP पाठविला जाईल, आलेला ओटीपी टाका.

४) यानंतर आपण पिक विमा कुठून भरला म्हणजे स्वतः भरला की सीएससी सेंटर वरती भरला का बँक मध्ये भरला ही माहिती सादर करा. त्यानंतर आपला पिक विमा पावतीवरील पॉलिसी नंबर टाका आणि ऊप्तश वर क्लिक करा.५) त्यानंतर आपल्या पिक निवडून आपल्या झालेल्या नुकसानीची सर्व माहिती भरा. यानंतर नुकसानीचा फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करा आणि विमा क्लेम सबमिट करा.

# क्रीडा भारतीचा उत्कृष्ट क्रीडा प्रशिक्षक पुरस्कार उत्रेश्वर पांचाळ यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ सप्टेंबर**

क्रीडा भारती च्या वतीने देण्यात येणारा यंदाचा उत्कृष्ट क्रीडा प्रशिक्षक पुरस्कार योग शिक्षक उत्रेश्वर पांचाळ यांना प्रदान करण्यात आला .

क्रीडा भारती अंबाजोगाई ची बैठक केशवनगर येथील सभागृहात संपन्न झाली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी क्रीडा भारती चे पश्चिम क्षेत्र संयोजक मिलींदजी डांगे,तर प्रमुख अतिथी म्हणून देवगिरी प्रांत सहमंत्री राजेंद्र कुलकर्णी उपस्थित होते.



यावेळी बोलतांना डांगे म्हणाले की, क्रीडा भारती ही क्रीडा क्षेत्रात कार्य करणारी मोठी संघटना आहे.शालेय व महाविद्यालयाचे जास्तीत जास्त विद्यार्थी मैदानावर खेळले पाहिजेत.बलोपासनेने शारीरिक मानसिक व बौद्धिक विकास होतो हे लक्षात घेऊन विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी सहभागी कसे होतील याकडे लक्ष दिले पाहिजे.शालेय जिवनात क्रीडा शिक्षकांनी खुप महत्वाची भूमिका बजावली पाहिजे असे मत व्यक्त केले.

दरम्यान यावेळी सन २०२४ चा आदर्श क्रीडा प्रशिक्षक पुरस्कार योग शिक्षक उत्रेश्वर पांचाळ गुरुजी यांना प्रदान करण्यात आला.तसेच श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर यांना आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा मंत्री विनायकराव वझे यांनी केले.तर आभार प्रदर्शन ज्ञानेश मातेकर यांनी केले.यावेळी सतिश बलुतकर,प्रा.राहुल चव्हाण, शिवकुमार निर्मळे, प्रा.दिलीप कांबळे प्रा.फटांगरे,सौ.मंदाकीनी गित्ते,श्री बोंदर सर,व राज्य पातळीवरील खेळाडू उपस्थित होते.

# किल्ले धारूर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या आढाव्यात उत्सवांच्या आयोजनाबाबत चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२ सप्टेंबर**

आगामी हिंदू बांधवांचा श्री गणेश उत्सव, पोळा व मुस्लीम बांधवांचा ईद ए मिलाद आदी उत्सवांच्या अनुषंगाने शांतता सुनिश्चित करण्यासाठी पोलीस ठाणे धारूर येथे दिनांक ३१ ऑगस्ट रोजी महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्ष स्थानिक उपजिल्हा पोलिस अधीक्षक चेतना तिडके मॅडम यांनी घेतले, तर यात तहसीलदार पाळवदे, पोलीस निरीक्षक वाघमोडे व नगरपालिका, पंचायत समितीसह लाईट कार्यालयातील प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत धारूर शहरातील सर्व गणेश मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, तसेच पत्रकार व मुस्लिम बांधवांनी सहभागी होऊन उत्सवांच्या काळात येणाऱ्या अडचणी आणि त्या अडचणींवर काय करावं याबद्दल आपली मते व्यक्त केली.आगामी उत्सवांच्या काळात पोलिसांचा गस्त वाढविणे आवश्यक आहे. विशेषतः गणेश उत्सवाच्या काळात सार्वजनिक स्थळी सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे.

उत्सवांच्या काळात होणाऱ्या वाहतूकच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्याबाबत चर्चा झाली. विशेषतः गणेश मूर्ती विसर्जनाच्या दिवशी प्रमुख रस्त्यांवर वाहतूक नियंत्रित करण्याची योजना तयार करण्यात आली.

विविध समुदायांदरम्यान शांतता राखण्यासाठी संवाद साधण्याचे महत्त्व या बैठकीत अधोरेखीत करण्यात आले. शांतीच्या वातावरणाच्या निर्मितीसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यावर विचार करण्यात आला.



गणेश उत्सव, पोळा, आणि ईदचे आयोजन कशाप्रकारे एकत्रितपणे करण्यात येईल याबाबत चर्चा झाली. विविध उत्सवांचे ठिकाण, वेळ व आयोजक यांबाबत सुसंगत योजना बनविण्यात येणार आहे.धारूर शहरातील रस्ते, मुख्य रस्ते, लाईट व पाणी यांसारख्या समस्यांवर नगरपरिषदेने लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.लाईट विभागाच्या प्रतिनिधीने धारूरमध्ये असलेल्या लाईट संदर्भातील सूचना आणि समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेवर चर्चा केली.संबंधित प्रतिनिधी सोडवण्याचे आश्वासन दिले व कामात सुरुवात केली.महसूल विभागाचे सर्व कर्मचारी मिरवणुकीदरम्यान उपस्थित राहतील, अशी माहिती तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी दिली, तसेच संबंधित कार्यालय लेखी माहिती प्रदान करेल.चर्चेत आलेल्या समस्यांवर तात्काळ निर्णय घेऊन संबंधित विभागांनी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि पुढील प्रत्येक उत्सव शांततेत पार पडेल यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले.यावेळी किल्ले धारूर शहरातील सर्व गणेश मंडळांचे अध्यक्ष, सदस्य पत्रकार मंडळी, प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, नगरपरिषद व पंचायत समितीचे महसूल विभाग लाईट विभाग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मोहनराव जगताप यांच्या जनसंपर्क गाठी भेटी दौऱ्यास उस्फुर्त प्रतिसाद

**गंगामसला, आनंदगाव सर्कल चा केला दौरा**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ सप्टेंबर**

माजलगाव विधानसभेचे भारतीय जनता पक्षाचे निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांनी मागील आठ दिवसापासून माजलगाव तालुक्यातील गंगामसला, सोमठाणा,निपाणी टाकळी,शिंपे टाकळी, खरात आडगाव, रामनगर, मोठेवाडी, गुंजथडी, सुरुमगाव, शुक्ल तिर्थ लिमगाव,खतगव्हान, डाके पिंपरी,कोथरूळ, मोगरा, माळतांडा, उमरी,जीवनापूर (नाथ नगर), लऊळ तांडा,साळेगाव, लोणगाव, सिमरी पारगाव या गंगामसला व आनंदगाव सर्कल मधील ग्रामस्थांची भेट घेण्यासाठी जनसंपर्क दौरा केला. या



भेटीदरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी अडीअडचणी आणि समस्या समजून घेतल्या. त्यांच्या अडचणींना सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन मोहनराव जगताप यांनी दिले.

या जनसंपर्क दोऱ्यावेळी आगामी विधानसभा निवडणूक मोहनराव जगताप हे लढवणार असल्याचे त्यांनी या दौऱ्याच्या माध्यमातून सांगितले आहे. या जनसंपर्क गाटी भेटी दौऱ्यास नागरिकांची गर्दी पहाता उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# हिंगोली जिल्ह्यात १५ मंडळांमध्ये अतिवृष्टी, पिकांचे मोठे नुकसान

## सोमवारी डोंगरगाव, देवजणा येथील २० जणांना पूरातून बाहेर काढले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

हिंगोली शहरासह जिल्ह्यात शनिवार आणि रविवारी अतिवृष्टी सदृश पाऊस पडला. अजुनही काही भागात मुसळधार पाऊस सुरूच आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ३० मंडळांपैकी १५ मंडळांमध्ये अतिवृष्टी सदृश पाऊस झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य सुरूच आहे. सोमवारी सकाळी डोंगरगाव, देवजणा येथील २० जणांना पुराच्या पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. आ. संतोष बांगर यांनी स्वत: बोटीमध्ये जाऊन या गावकऱ्यांना बाहेर काढण्यात मदत केली आहे.

हिंगोली जिल्ह्यात शनिवारपासून अतिवृष्टी तर कुठे ढगफुटी सदृश पाऊस सुरू आहे. या पावसामुळे जिल्हाभरात शेताला तळ्याचे स्वरूप आले आहे. सोयाबीन, कापूस, ज्वारी, उडीद, मुग, हळद, ऊस आदी पिके पाण्याखाली असून काही ठिकाणी पिके खरडून गेले आहेत. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. विशेष म्हणजे उडीद, मुग काढणीला आले होते तर सोयाबीनचे पीक शेंगा लागण्याच्या स्थितीत होते. परंतु अतिवृष्टीमुळे या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे चित्र सध्या दिसत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

जिल्ह्यात ३० मंडळापैकी १५ मंडळांमध्ये ढगफुटी सदृश पाऊस झाला असून त्यामुळे नदी, नाले, ओढे, तलाव ओव्हरफ्लो झाले आहेत. सोमवारीही पावसा-चा जोर जिल्ह्यात काही ठिकाणी कायम होता. मागील चोवीस तासात नर्सी नामदेव मंडळात १५३ मिलीमीटर, सिरसममध्ये १४९ मिमी, बासंबा २२५ मिमी, वाकोडी १५४ मिमी, नांदापूर १६४ मिमी, आखाडा बाळापूर १०६ मिमी, वारंगा ११२ मिमी, हयातनगर ८५ मिमी, हट्टा ११३ मिमी, कुरूंदा १११ मिमी, सेनगाव १२४ मिमी, आजेगाव ८० मिमी, साखरा १३३ मिमी, पानकनेरगाव १३४ मिमी तर हत्ता मंडळात १६९ मिमी पाऊस झाला आहे.

या पावसामुळे शेतातील आखाड्यावर अडकलेल्या शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांना सुखरूप बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्यासह अधिकाऱ्यांनी मागील ४८ तासापासून मदत व बचाव कार्यास सुरूवात केली आहे. त्यासाठी विविध पथके स्थापन केली आहेत. आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून रेस्क्यू ऑपरेशन केले जात आहे. वसमत तालुक्यातील टेंभूर्णी येथे सुभाष बाबुराव सवंडकर हा तरूण पुराच्या पाण्यात वाहून गेला होता. त्यांचा मृतदेह पुराच्या पाण्यात आढळून आला आहे. तहसी-लदार शारदा दळवी यांच्या पथकाने सोमवारी किन्होळा कुरूंदासह परिसरातील गावांना भेटी देऊन पाहणी केली आहे. पाऊस कायम राहील्यास कुरूंदा येथील चारशे जणांना स्थलांतरीत करण्याची तयारी प्रशासनाने केली असल्याचे तहसीलदार शारदा दळवी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तातडीची बैठक बोलावली असून जिल्ह्यातील नुकसानीची माहीती घेण्यास सुरूवात केली आहे. याशिवाय पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी डोंगरगाव, देवजणा, चिखली येथील आखाड्यावर अडकलेल्या २२ जणांची रेस्क्यू पथकाच्या माध्यमातून सुखरूप सुटका केली आहे. स्वत: आ. बांगर यांनी रेस्क्यू टीमच्या बोटीमधून जाऊन मदत केली आहे. यामध्ये एका चार महिन्याच्या बालकासह महिला, मुली व शेतमजुरांचा समावेश आहे. सोमवारी सकाळपासून आ. संतोष बांगर रेस्क्यू टीमला सोबत घेऊन मदत करीत असल्याचे दिसत आहेत.

# नदीकाठच्या गावांनी सतर्क रहावे- जिल्हाधिकारी

## पूलावरून पाणी जात असतांना पूल ओलांडू नका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**



जिल्ह्यात पुढील दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या ७१ गावांतील नागरिकांनी सतर्क रहावे तसेच पूलावरून पाणी जात असतांना पूल ओलांडू नये. परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व प्रकारच्या आपत्ती यंत्रणा सज्ज असून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

जिल्ह्यात मागील चोवीस तासात अतिवृष्टी झाली आहे. या पावसामुळे नद्या, नाले, ओढे यांना पूर आला असून शेती पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे. भोगाव, शेवाळा, टाकळगव्हाण, सावरखेडा, जडगाव सह इतर ठिकाणी शेतकरी शेतातील आखाड्यावर अडकून पडले होते. या नागरिकांना काढण्यासाठी रेस्क्यू टीम पाठवून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. ज्या ठिकाणावरून माहीती मिळेल त्याठिकाणी तातडीने रेस्क्यू टीम पाठवली जात आहेत.

हवामान विभागाने पुढील दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी गोयल यांनी केले आहे. कुठलीही अडचण आल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधवा तसेच पूलावरून पाणी जात असतांना पूल ओलांडू नये पूला-वरील पाणी ओसरण्याची वाट पहावी तसेच पुढील दोन दिवस शेतात पाहणी करण्यासाठी जाऊ नये. ज्यामुळे अच-ानक मोठा पाऊस व पूर आल्यास शेतात अडकून पडण्याची भिती राहणार नाही.

जिल्ह्यातील तीनही उपविभागीय अधिकारी, तह-सीलदार आणि क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी यांना सतर्क राहण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. पूरात अडकलेल्या किंवा पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिक व गावकऱ्यांचे स्थलांतर करण्यासाठी मंगल कार्यालय, शाळा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. गावकऱ्यांची कुठेही गैरसोय होणार नाही याची दक्षता प्रशासकडून घेतली जात आहे. पोलिस प्रशासन, जिल्हा परिषद प्रशासन, आरोग्य विभाग, नगर पालिका प्रशासनालाही समन्वय साधून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आ-हेत. याशिवाय सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये. स्वत:ची काळजी घ्यावी तसेच प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

# कनेरगावनाका येथील व्यापाऱ्याचे हातपाय बांधून रोख रक्कम आणि दागिने चोरट्यांनी केले लंपास

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**



तालुक्यातील कनेरगावनाका येथे भुसार व्यापाऱ्याच्या घरात शिरलेल्या चार चोरट्यांनी सोमवारी पहाटे हातपाय बांधून तोंडाला चिकटपट्टी लावून कपाटातील १ लाख रूपये रोख आणि १४ तोळे सोन्याचांदीचे दागिने लंपास केले.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार कनेरगाव नाका येथील भुसार व्यापारी पुरूषोत्तम बाहेती हे रविवारी रात्री कुटुंबियांसह भोजन करून घरात झोपले होते. मध्यरात्रीच्या सुमारास घराच्या दरवाजाचा आवाज आल्याने त्यांनी उठून पाहीजे असता कोणीही दिसले नाही. त्यानंतर ते घरात येताच घराज शिरलेल्या चार चोरट्यांनी त्यांना चाकू, गुप्तीचा धाक दाखवून आवाज निकालना नाही असे धमकावले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे बाहेती घाबरून गेले. यावेळी चोरट्यांनी त्यांचे हातपाय बांधून त्यांच्या तोंडाला चिकटपट्टी लावली. त्यानंतर पैसे कुठे आहेत अशी विचारणा केली. मारहाणीच्या आणि कुटुंबियांना काही त्रास होऊ नये या भितीने बाहेती यांनी पैसे कुठे ठेवले ते दाखवून दिले. चोरट्यांनी एक लाख रूपये ताब्यात घेतले. त्यानंतर घरातील दोन कपाट फोडून त्यातील सुमारे १४ तोळे सोन्याचांदीचे दागिने घेऊन घराला बाहेरून कडी लावून चोरटे पसार झाले. जातांना त्यांनी मोबाईल सोबत नेला. तसेच आव-ाज निकालना नाही, किसीको बोलनेका नाही अशी धमकीही दिली.

दरम्यान, काही वेळानंतर त्यांचा कुटुंबियांना हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांच्या मुलीने खिडकीतून बाहेर येऊन दररवाजे उघडले. या घटनेची माहीती मिळताच बासंबा पोलिस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले मात्र पावसामुळे श्वान पथक जागेवरच घुटमळले. याप्रकरणी अद्यापर्यंत बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता.

# जिल्ह्यात संततधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा- चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**



मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यात संततधार मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक गोरगरीबांच्या घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहीत्याचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने नुकसान झालेल्या भागाचे पंचनामे करून शेतकरी आणि पूरग्रस्तांना मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांचेकडे केली आहे.

जिल्ह्यात १ आणि २ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस पडला असून अजूनही अनेक भागात पाऊस सुरूचे आहे त्यामुळे हाताल आलेले पीक शेतकऱ्यांच्या हातून गेले असून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच पुरग्रस्तांचेही मोठे नुकसान झाले आहे. या सर्व भागांचे तत्काळ पंचनामे करावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, निहाल, अनिल पतंगे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### सरसकट ओला दुष्काळ जाहीर करण्याची रामदास पाटील यांची उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी



हिंगोली- हिंगोली विधानसभा क्षेत्रासह जिल्ह्याभरात १ आणि २ सप्टेंबर रोजी प्रचंड मोठी अतिवृष्टी झाली. वादळी वाऱ्यासह जोरदार बरसलेल्या पावसामुळे नदी-नाल्यांना महापुर आला आहे.या पावसाने शेतकरी बांधवांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सोयाबिन, तूर, हळद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे.काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत.तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेले आहेत. उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे.जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा फटका बसला आहे.तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाला तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी भाजपचे लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे पत्राद्वारे केली आहे.

### कोनाथा येथे बैलपोळा उत्साहात साजरा



वसमत- तालुक्यातील शेतकरी राजाचा सण म्हणजे बैलपोळा मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला कोनाथा येथे आज सकाळपासूनच शेतकरी राजा आपापली बैल शेतामध्ये धुवून सजवून, झुल्ली घालून गावातील महारुद्र मंदिराकडे आणण्यात आले. दुपारी दोन वाजता गावातील सर्व शेतकरी आपापले बैल मंदिराकडे आणून उभे केल्यानंतर बैलाची महापूजा करण्यात आली नंतर बैलांचे लग्न लावण्यात आले लग्न लावल्याच्या नंतर महारुद्र मंदिराला शेतकरी आणि बैलांनी प्रदक्षिणा मारल्या. बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला.

# औंढा नागनाथ तालुक्यात ढगफुटी सदृश पाऊस, पिकांचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २ सप्टेंबर**



औंढा नागनाथसह तालुक्यात एक सप्टेंबर रोजी ढग सदृश पाऊस पडल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी घरांचे नुकसान तर काही ठिकाणी घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहीत्याचे नुकसान झाले आहे.

सर्वाधिक पाऊस येहळेगाव सोळंके मंडळात १८५ मिलीमीटर झाल्यामुळे शेती पिकासह, रस्त्यांचे पूल तुटणे, घरात पाणी शिरणे घरा-तील अत्यावश्यक सामानाचे नुकसान झाले. रामेश्वर, सारणा, उंडेगाव परिसरात १३५ ते १४० मिमी.पाऊस पडला, रस्त्याचे काम चालू असताना नागेशवाडीजवळ पुलावरून पाणी वाहत असताना दिवसभर वाहतूक ठप्प झाली होती. औंढा नागनाथ, पिंपळदरी नांदापूर रस्ता सर्वत्र नदी, नाले तुडुंब भरून वाहत असल्यामुळे बंद पडला होता. शेती पिकांचे नदीनाल्याच्या दोन्ही बाजूच्या शेतजमिनी खरीप पिकासह नष्ट झाल्या. इतरत्र सोयाबीन, कापूस, हळद, उडीद मूग ही खरीपाची पिके खरडून वाहून गेले. जलालदाबा येथे बेलेमंडळींच्या शेता नजीकचा तलाव फुटून तलावा खालची शेती खरडून गेली तर पिंपळदरी येथे नदीच्या काठाची सर्व शेत पुराच्या पाण्याने खरडून शेतकऱ्यांचे अत-ोनात नुकसान झाले. औंढा नागनाथ सह तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. याबाबत आम दार संतोष बांगर यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना विचारणा केली असता औंढा नागनाथ तालुका सह जिल्ह्यामध्ये जिथे जिथे अतिवृष्टी झाली त्या त्या ठिकाणच्या खरीप हंगामातील शेती पिकांचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई मिळण्यासंबंधीचा अहवाल शासनाकडे त्वरित पाठवण्यात येईल. महसूल प्रशासनासह तालुका कृषी कार्यालय, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आदींना सर्वत्र कामाला लावले असून या सर्व परिस्थितीवर तहसीलद-ार, तालुका कृषी अधिकारी, आणि गटविकास अधिकारी लक्ष ठेवून असून आवश्यक त्या ठिकाणी शासनाचे सर्व सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे. तालुक्यात शेती पिकाचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी मात्र पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे. औंढां नागनाथ मंडळांम ध्ये ही शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असले तरीही जीवित हानीमध्ये असोला येथे एक गाय दगावली तर औंढयामधे एक, माथा व वगरवाडी येथे एक असे मिळून तीन घरांची अंशतः पडझड झाली तर औंढा येतील एका नाल्यावरील दुकानात पाणी शिरल्याने दुकानातील सर्व साहित्य वाहुन गेले शिवाय सकाळी साडेबाराच्या सुमारास औंढा नागनाथ पोलीस स्टेशन येथे वायरलेस टावर वर विज पडल्याने मोठी हानी झाली. ज्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये असलेले सर्व विद्युत उपकरणे हे जळून गेल्याने क्षतीग्रस्त झाले आहेत. त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये असलेले सर्वच इलेक्ट्रिक इन्स्ट्रुमेंट बंद पडले तर टावर जवळील भिंतीला आहे काही प्रमाणात क्षती पोहोचली आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे सुरू करा- गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन शेती पिकाचे, पशुधन, घरे, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे सुरू करावेत, असे निर्दे श जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी ऑनलाईन बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले आ-हेत. आज गुगलमीटद्वारे ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिम न्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजल, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी, विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात काही गावामध्ये नागरिक पुराच्या पाण्यात अडकून पडले. त्या सर्वांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून, त्यांच्या अन्न-पाणी आणि निवाऱ्याची सोय करावी. पाऊस आणि पुराच्या पाण्याने जिल्ह्यातील नुकसान झालेल्या भागातील शेती, घरे, व जनावरांचे तातडीने पंचनामे सुरु करावेत. या अतिवृष्टीमध्ये जीवित व वित्तहान-ीची परिपूर्ण माहिती तयार करावी. तसेच मदतीची आवश्यकता असलेल्या ठिकाणी तातडीने मदत पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच महावितरण विभागाने खंडीत झालेला वीज पुरवठा सुरळीत करण्याची प्राधान्याने आणि तात्काळ कार्यवाही करावी. तसेच वीज उपकेंद्र, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रामध्ये पाणी शिरले आहे, त्या ठिकाणचे पाणी काढून देण्याची व्यवस्था करावी.

जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आज पालकमंत्री अब्दुल सत्तार हे भेट देऊन पाहणी करणार आहेत. यामध्ये आडगाव, सावरखेडा, सोडेगाव, डोंगरगाव पूल येथे पाहणी करणार आहेत. तसेच त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनाकडून आढावा घेणार असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

# कुरूंद्यात पुराचे पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहीत्याचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, २ सप्टेंबर**



तालुक्यातील कुरुंदा येथील जलेश्वर नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करूनही गा-वातील गणेश नगर, रायगड नगर व साईबाबा गल्लीमध्ये २ सप्टेंबर रोजी सकाळी तीन ते चारच्या दरम्यान पुराचे पाणी घुसून बऱ्याच जणांच्या घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले.

आधीचे खोलीकरण झाल्यानंतर गावामध्ये नदीचे पाणी न येता गावातील पाणी व चोंडी रोड कडून येणारे पाणी टोकाई रोडच्या दोन्ही साईडने नदीत जाण्याऐवजी गणेश नगर, रायगड नगर, साईबाबा गल्लीमध्ये शिरले. यापूर्वी गावातील पाणी व चोंडी रोड कडून येणारे पाणी टोकाई रोडच्या दोन्ही बाजूंनी मोठा नाला असल्यामुळे ते पाणी सरळ नदीला जायचे परंतु त्या पाण्याच्या मार्गामध्ये जागोजागी अडथळे निर्माण करण्यात आले आहेत. पाणी जाण्यासाठी नाला राहिलेला नाही. टोकाई रोडच्या दोन्ही साईडने नाला काढण्यासाठी मागील पूर पुराच्या वेळेस जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला टोकाई रोडच्या दोन्ही साईडने मोठे नाले काढण्याच्या सूचना केल्या होत्या. परंतु नाल्याचे काम झाले नाही. त्यामुळे नदीचे खोलीकरण रुंदीकरण करूनही गणेश नगर भागातील झोपडपट्टी मधील पाणी शिरून गोरगरीब जनतेचे मोठे नुकसान होत आहे. जोपर्यंत गावातील व तोंडी रोडच्या साईडने येणारे पाणी टोकाई रोडच्या दोन्ही बाजूने नाला करून नदीमध्ये सोडले जात नाही तोपर्यंत हा पूर प्रश्न मिटणार नाही. सदरील पाण्याची कलेश्वर नदीमध्ये काढून दिल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. असे असताना सुद्धा गावात थातूरमातूर नाला करून वेगळ्याच मार्गाने पाणी काढून देण्याचा केविलवाणा प्रयत्न होताना दिसत आहे. पुरामुळे संसार उपयोगी साहित्याची नासाडी झाली. पुराच्या पाण्यामुळे होणाऱ्या त्रासातून कायमची मुक्तता करावी अशी मागणी येथील रहीवाशांनी प्रशासनाकडे केली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्यात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२ सप्टेंबर -**

जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू असुन या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतीचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी पुन्हा एकदा हवालदील झाला आहे. शहरातील तीन पुलं पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. विष्णुपुरी प्रकल्पाचे ११ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

नांदेड शहरात सर्वत्र पावसाने नागरिकांची दाणादाण उडविली आहे. गोदावरी, पैनगंगा, आसना, मन्याड, लेंडी नद्या तुडुंब भरून वाहत आहेत. नदीकाठच्या लोकांना तसेच गावांना जिल्हाधिकाऱ्यांनी सतर्कतेचे आदेश दिले आहेत. सर्वच नदीपात्राच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्याने पाण्याची आवक सतत सुरू आहे. त्यामुळे विष्णुपुरी प्रकल्पाचे ११ दरवाजे उघडून १ लाख ४६ हजार ४४७ क्यूमेक्स पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आले आहे. त्यामुळे गोदावरी दुथडी भरून वाहत आहे. गोदावरी नदी काठावर शहरातील अनेक घाट पाण्याखाली गेले आहेत. एवढेच नाही तर शहरातील तीन पुलं पूर्णपणे पाण्याखाली आले आहेत. यात हिंगोली गेट येथील अंडरब्रिज कालपासूनच पाण्याखाली आहे. त्याचबरोबर लालवाडी येथील अंडरब्रिजही पाण्याखाली गेला आहे. तर जुने नांदेड ते सिडकोला जोडणारा नावघाट पूलही आज पाण्याखाली गेला आहे.

जोरदार पावसामुळे रेल्वे वाहतूक आणि बस वाहतूकीवरही परिणाम झाला आहे. शहरातील विष्णूनगर, गोकुळनगर, वसंतनगर, हमालपुरा, इस्लामपुरा, खडकपुरा, सैलाबनगर, शक्तीनगर या सकल भागामध्ये तसेच श्रावस्तीनगरचा काही भाग, भीमसंदेश कॉलनी, तरोडा भागातील काही भाग, देगलूर नाका परिसरातील अनेक भाग पाण्याखाली गेले आहेत. अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने अनेक नागरिकांना महानगरपालिकेच्या वतीने सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात येत आहे. शहरातील रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यात महावीर चौक, श्रीनगर, बाबानगर, आनंदनगर, अण्णाभाऊ साठे चौक या रस्त्यावरून पाणी पाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली. हिंगोली गेट अंडरब्रिजप्रमाणेच लालवाडी अंडरब्रिजही पूर्ण पाण्याखाली आल्याने हा मार्ग बंद करण्यात आला आहे.

पैनगंगा नदीला पूर आल्याने विदर्भ आणि मराठवाडा सीमेवर असलेला सहस्त्रकुंड धबधब्याने रौद्ररूप धारण केले आहे. नांदेड ते मुदखेड,गाडेगाव मार्गे जाणारा रस्ता सीता नदीला पूर आल्याने वाहतुकीसाठी बंद केला आहे. जिल्ह्यात व शहरात पावसाने हा हाहाकार माजविला आहे. अनेक शाळांना सुट्टी देण्यात आली आहे, तर काही भागात पाणी शिरल्याने महानगरपालिकेच्या वतीने पाण्याचा निचरा करण्यात येत आहे. विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल ह्या स्वतः आपल्या यंत्रणेवर लक्ष ठेवून आहेत.

शेतातील सोयाबीन, तूर, मूग तसेच बागायती पिकांना मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांकडून सतर्कतेचा आदेश देण्यात आला आहे. येणाऱ्या काही तासांमध्ये पुन्हा जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

**विष्णुपुरी प्रकल्पाचे १४ दरवाजे उघडले**

डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वत्र पाऊस सुरु आहे. त्यामुळे प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु असल्याने प्रकल्पाचे १४ दरवाजे उघडले आहेत. पाण्याचा मोठ्या प्रमाणात नदीपात्रात विसर्ग होत असल्याने पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाच्या खालील बाजूस नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याबाबत इशारा देण्यात आला आहे.

## ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट आर्थिक मदत जाहीर करा: रामदास पाटील



**तभा वृत्तसेवा**
**माहुर,२ सप्टेंबर -**

हिंगोली जिल्हा आणि लोकसभा क्षेत्रांतर्गत येत असलेल्या हिंगोली,यवतमाळ व नांदेड या जिल्ह्यातील माहूर, किनवट,हदगाव, हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकरी बांधवांना आर्थिक मदत करण्याची मागणी हिंगोली भाजपाचे रामदास पाटील सुमठाणकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

हिंगोली विधानसभा क्षेत्रासह जिल्ह्याभरात रविवारी १ सप्टेंबर रोजी प्रचंड मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. वादळी वाऱ्यासह जोरदार बरसलेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे नदी-नाल्यांना महापुर आला आहे.या पावसाने शेतकरी बांधवांच्या उभ्या शेतमालासह शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सोयाबिन, कापूस,तूर, मुग, उडीद,हळद,इत्यादींसह फळबागा व भाजीपाला या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून, संसार उघड्यावर आला आहे.काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत.

त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेली आहेत.उभी पिके पाण्यात वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला हिरवा घास ऐण पोळ्याच्या दिवशी हिरावला गेला आहे.नदीनाल्यांना आलेल्या पुरामुळे जमिनी खरडून गेल्याने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे.मुसळधार पावसाचा मोठा फटका बसून अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले असल्याने शेतकरी कमालीचा हतबल झाला आहे. असे निवेदनात नमूद करत अतिवृष्टी ची आंखोदेखी करूण व भयावह व्यथा मांडण्यात आली आहे. निवेदनात पुढे लिहिले आहे कि, उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या अस्मानी संकटाच्या बिकट प्रसंगी लक्ष घालून,जिल्हाप्रशासनाला शेती, शेतपीके, घरे,दुकाने, रस्ते,पाळीव प्राणी या सर्व बाबतीत तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांसह आपत्तीग्रस्तांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी. अशा मागणीची विनंती रामदास पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

## हदगाव तालुक्यास पावसाने झोडपून मोडले मागचे विक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,२ सप्टेंबर -**

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार ३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर पर्यंत मराठवाड्यासह महाराष्ट्रात अति मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्याच अंदाजानुसार हदगाव शहरासह पूर्ण तालुक्यात मागील दोन दिवसापासुन अति मुसळधार पाऊस झाल्याने आज सकाळपासूनच जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून १०० फुटाचा रस्ता असलेल्या हदगाव ते नांदेड महामार्ग काही तासासाठी बंद होता तर आजच्या झालेल्या पावसाने मागच्या ५० वर्षाचे सगळेच विक्रम मोडल्याचे मत प्रस्तुत प्रतिनिधी जवळ तालुक्यातील शेतकरी बांधवांनी व्यक्त केले.

दि.१ सप्टेंबर रोजी सकाळपासूनच ढग दाटून आल्यानंतर सगळीकडेच काळोखा पसरल्यानंतर अति मुसळधार पावसाची सुरुवात झाली. हदगाव तालुक्यातील सहा महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून ईसापुर धरणाची पातळी काही तासाच्या पाण्याने अंदाजे १० टक्क्यांनी वाढली, जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांना सतर्कता बाळगण्याचे आव्हान करण्यात आले असून लवकरच नुकसानीचा पंचनामा करण्यात येणार असल्याचे सुद्धा कळविण्यात आले. पावसाने जर विश्रांती घेतली नाही तर हातातील आलेले पीक पूर्णपणे जाण्याची भीती सुद्धा यावेळेस शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.

## लोहा तालुक्यात सर्वदूर मुसळधार पाऊस; नदी नाल्यांना पूर जनजिवन विस्कळीत



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,२ सप्टेंबर -**

हवामान खात्याने दिलेल्या अंदाज खरा ठरवीत लोहा तालुक्यात सर्वदूर मुसळधार पाऊस बरसला. शनिवारी रात्री पासून सुरू झालेला पाऊस सोमवारी दिवसभर खंड देता मुसळधार पाऊस चालू आहे . पावसामुळे नदी नाल्याना पुर आल्याने कांहीं गावांचा संपर्क तुटला होता. दुपारी पावसाचा वेग मंदावल्याने नदी नाल्यांचे पूर ओसरला या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.

शनिवारी रात्री पासून खंड देत सोमवारीही दिवसभर पाऊस सुरूच आहे. रविवारी, सोमवारी सकाळी मेघ गर्जनेसह मुसळधार पाऊस झाल्याने तालुक्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आला होता. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. सायाळ, पेनुर, गांधीनगर, चितळी, आदींसह बहुसंख्य गावांचा इतर गावांशी संपर्क तुटला होता. मात्र दुपारी दीड नंतर पावसाचा वेग मंदावल्याने पूर परिस्थिती ओसरली. असली तरी हवामान खात्याने पुढील दोन ते तीन दिवस नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे.

## मुसळधार पावसामुळे नाल्याचे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,२ सप्टेंबर -**

ईस्लापूर शहर व परिसरामध्ये मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे नाल्या काठच्या वसाहतीमध्ये पुराचे पाणी शिरल्याने येथील लोकांनी रात्र जागून काढली येथील विजय वानखेडे, रामदेव वदीलवाड, अरुण बोनगीर,हानमंतू ताटेवाड, बाबुराव गवाळे,आडेलू डुडेल, पुण्यशील गवाळे,उत्तम चव्हाण,बापुराव पवार,शैलार,यांच्या राहत्या घरामध्ये कमरेवर पुराचे पाणी शिरले, सर्व संसार उपयोगी साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले नाल्या काठच्या भागात हातावर पोट भरणारे नागरिक राहतात येथील नागरिकांनी विशेषत महिलांनी आक्रोश व्यक्त करत व्यथा मांडली दरवर्षीच्या पावसाळ्यामध्ये घरामध्ये पाणी जाऊन घरपयोगी वस्तू व धान्याची नासाडी होती.

पुराचे पाणी नाल्यामध्ये मावत नसल्याकारणाने नाल्याचे पाणी आमच्या घरामध्ये घुसत आहे. येथील प्रशासनाने नाल्याचे रुंदीकरण करून गावांमध्ये पाणी शिरणार नाही यावर उपाययोजना कराव्यात अशी मागणी नाल्या काठच्या वसाहतीतील लोकांनी केली आहे

## तामसा हायस्कूलला शैक्षणिक साहित्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३१ ऑगस्ट -**

तामसा येथील जिल्हा परिषद हायस्कूलला सीएसआर फंडामधून विविध शैक्षणिक वस्तू मिळाल्या आहेत. एसबीआय बँकेने २५० ड्युल डेक्स, १० डायस, ५ कपाटे आणि ५ क्लास रूम टेबल दिले आहेत. या शाळेतील सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी हे साहित्य देण्यात आले आहे. यापूर्वी देखील लोकसहभागामुळे जिल्ह्यातील अनेक शाळा आणि अंगणवाडी डिजिटल बनल्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या सहभागातून आणि शैक्षणिक साहित्याच्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी-सुविधांचा लाभ होण्यास मदत होत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी व्यक्त केले.

## अध्यात्म व विज्ञानाच्या समन्वयातूनच खरे समाधान मिळेल : प.पु. सद्गुरु नराशाम महाराज येवतीकर

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,२ सप्टेंबर -**

ज्ञानेश्वर माऊलींनी गुरुभक्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे.खरे तर भारतीय अध्यात्माचे महत्त्व जर्मनी व जपान सारख्या राष्ट्रांना कळाले पण आपण मात्र म्हणावे तेवढे याबाबतीत जागृत राहिलो नाहीत. पण अलीकडे नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय संस्कृतीला महत्त्व दिले जात आहे.इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती लावून आपल्या संस्कृतीवर घाला तरघातला. गुरुचे दोन प्रकार सांगितले जातात शिक्षा गुरू व दीक्षा गुरु. विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातूनच खरे समाधान लाभते. असे प्रतिपादन प.पु. सद्गुरु नराशाम महाराज येवतीकर यांनी केले. ग्रामीण (कला,वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड जी.नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व प्रस्तुत महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदवी वितरण प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य दिलीप गायकवाड,सेवादास उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विजयकुमार जाधव,प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गोविंद पवार,उपमुख्याध्यापिका प्रेमाला स्वामी,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक, पदवी स्वीकारणारे विद्यार्थी विद्यार्थिनी व अन्य विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहा पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,२ सप्टेंबर -**

लोहा शहरातील मोंढा मच्छी मार्केट भागामध्ये ८ जन बावन पत्याचा खेळ खेळत असल्याबाबत माहिती मिळताच पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा पोलिसांनी छापा टाकुन यातील ८ आरोपींना पकडले. या कारवाईत पोलिसांनी डावावरून बावन पत्याचे कॅट, रोख रक्कम, चार मोटारसायकली, ८ मोबाईल असा एकुण ३ लाख ८२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केले असुन महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर दि.३१ऑगस्ट रोजी लोहा पोलिसांनी ऑनलाईन जुगार गुडगुडी वर रेड करून ६ आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गावाच्या बाहेर शेतामध्ये एका शेडमध्ये लॅपटॉप कीबोर्ड माऊस चार्ट याच्या साह्याने ऑनलाइन गुडगुडी चा खेळ खेळविला जात असल्याबाबत लोहा पोलिसांना माहिती मिळाल्या वरून लोहा पोलिसांनी सदर ठिकाणी छापा मारून ६ आरोपीन विरोधात गुन्हा दाखल केला. शेतातील शेडमध्ये जुगार बसविण्यात आल्यामुळे शेडमालकाला पण आरोपी करण्यात आले आहे. यात ५४ हजारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोउपनि रोडे व त्यांच्या टीमने केली.


शहरासह परीसरात कुठेही कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालू असल्याबाबत माहिती मिळाली असल्यास तात्काळ फोन करून किंवा व्हाट्सअप वर द्यावी असे आवाहन पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले आहे.

## आदमपुरात बैलपोळा सण साजरा

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,२ सप्टेंबर -**

बिलोली तालुक्यातील आदमपूर येथे दि.०२ सप्टेंबर रोजी बैलपोळा हा सण उत्साहात साजरा करण्यात आला.मागच्या शनिवारी मध्य रात्रीपासून बेफाम पाऊस सर्वदूर कोसळत होता.रविवार पूर्ण दिवस पाऊस तुडुंब बरसला.पोळा सणावर पावसाचे सावट निर्माण झाले होते. नदी,नाल्यांना पूर आला होता. सोमवार सायंकाळी चार वाजता पावसाने उघडीप दिली आणि घरीदारी कषृक परंपरेतील पोळा हा सण साजरा झाला.गावातील मारोतीच्या पाराभोवती सजवलेल्या बैलांची फेरी पूर्ण करताना शेतकरी आनंदित होते. शेवटी घरासमोर पुन्हा मग बैलांची विधिवत पूजा आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बैलांप्रति कृतज्ञ भाव शेतकरी व्यक्त करताना दिसून येत होते. मानकरी, गावकरी,लहान मुलांची भरगच्च पाराभोवती उपस्थित होती.

## वैद्यकीय प्रवेशासाठी ओम आडकीनेला हवा मदतीचा हात



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२ सप्टेंबर -**

वैद्यकीय (एमबीबीएस) प्रवेशासाठी पहिल्याच यादीत पात्र ठरूनही केवळ घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने ओम आडकिने या होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न भांगण्याची भीती निर्माण झाली असून त्याचे साकार होण्यासाठी दानशूर व्यक्तींनी त्याला मदतीचा हात पुढे करून आर्थिक सहाय्य करावे असे आवाहन त्याच्या पालकांनी केले आहे.

पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज अमरावती येथे पहिल्या यादीत सेमी गव्हरमेंट मधून प्रवेशासाठी पात्र ठरूनही पुढील दोन दिवसात सात लाख रुपयांची व्यवस्था करू न शकल्यास ओम आडकीनेच्या चइइड प्रवेशाचे स्वप्न भंगण्याची भिती ओमच्या पालकांनी जड अंतकरणाने व्यक्त केली आहे. छएएढ परीक्षेत ६१३ गुण घेऊन प्राविण्य प्राप्त केले असले तरी यावर्षीच्या वाढत्या कट ऑफमुळे ६१३ गुणाला गव्हरमेंट कॉलेजमध्ये मिळू शकले नाही. सेमी गव्हरमेंट मध्ये प्रवेशास पात्र ठरूनही प्रवेश घेण्याची आर्थिक परिस्तिती नसल्यामुळे ओमचे वडील सुरेश आडकीने यांनी मदतीचे नम्रपणे आवाहन केले आहे. ओमला पुढील दोन दिवसांमध्ये सात लाख रुपये रक्कम जमा करावयाची आहे. परंतु त्याच्याकडे सध्या फक्त दोन लाख रुपये जमा झाले आहेत. उर्वरित रक्कम जमा न झाल्यास जिद्दीने अभ्यास करून वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या ओमच्या मेडिकल प्रवेशाची संधी हुकन्याची भीती निर्माण झाली आहे. याकरीता फोन पे नंबर ९३७३१०६१६७ ओम सुरेश अडकिणे यांचा असून आपण अकाउंट नंबर वर स्वछेने आर्थिक मदत पाठवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## माहिती अधिकार निमावलीत पुर्ण माहिती न देणाऱ्या आधिकारी विरुद्ध न्यायालयात जाण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,२ सप्टेंबर -**

तालुक्यात रोजगार हमी मध्ये भष्ट्राचार असुन त्या अनुषंगाने माहिती अधिकार नियमानुसार प्रथम व्दितीय अपिल नोटीस वेळेवर न दिल्याने आपण जनसंपर्क माहिती अधिकारी गटविकास अधिकारी पंचायंत समिती उमरी यांच्या विरोद्धात न्यायालयात जाणार असल्याचे स्वाभिमानी ब्रिगेड या सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश सैदमवार यांनी दै तरुण भारत प्रतिनिधीशी बोलतानां प्रतिक्रिया दिली आहे .

यापुढे आकाश सौदमवार म्हणाले की , उमरी तालुक्यात रोजगार हमी मध्ये मोठा भष्ट्राचार असून रोजगार सेवक , ग्रामसेवक सरपंच याध्ये मळून असून त्यांचावर गटविकास अधिकारी यांचा आशीर्वाद आहे .



उमरी तालुक्यात ५८ ग्रामपंचायत आहेत महसुल गावे ६२ आहेत . प्रत्येक गावात शासकीय रोजगार हमी योजनेअंतर्गत गाव पातळीवर मोठ्या प्रमाणात निधी आला पण त्या कामात भष्ट्राचार झाला आहे प्रत्येक गावात लाभार्थी एक काम न केलेल्य चुकार मर्जीतल्या लोकाचे अधारकार्ड लिकं करून शासकीय प्रत्येक योजनेत बोगस रोजदार यांचे नावे अंगठा, सही करून पोष्ट खाते इतर बँक स्लीप मध्ये सहया घेवून टक्केवारी खावून रोजगार हमी योजनेत भष्ट्राचार केला असल्याचा अरोप माहीती न दिल्याने सैदमवार यांनी केला आहे . तालुव्यात भष्ट्राचार करून शासनाची फसवूनक करीत आहेत अशा अस याचे निवेदन दिले आहे.

त्या संदर्भानुसार जनमाहिती अधिकारी यांना अर्ज दि २१ मे २०२४ रोजी देवून माहीती अधिकार कायदा २००५ नुसार प्रथन व व्दितीय अपिल नियमा नुसार करून माहिती मागविली होती पण

त्या माहिती अधिकार नियमाच्या अनुषंगाने सुनावणी तारीख नुसार सात दिवस अगोदर कोणतीही नोटीस पुर्व कल्पना न देता एक तर्फी निर्णय दि. ३० / ०८ / २०२४ निर्णय घेतला आहे त्यामुळे मला सुनावणी दिनी उपस्थित राहू शकलो नाही . असे आकाश सैदमवार यांनी माहीती देत उमरी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचे माहीती अधिकार व्दितीय अपिल केल्याने ही दुर्लक्ष झाल्यान मी आकाश सैदवार पुढील न्याय मागण्यासाठी प्रथम कोर्टात न्याय मागणार असून संबंधीत कर्मचारी यांनी माहीती अधिकार यांचा नियमावलीचा माहिती न देता अपान व दिरंगाई केल्या प्रकरणी संबंधीत कर्मचारी यांच्यावर शासकीय दंडाची किवां निलंबनाची कार्यवाही करावी अशी मागणी करणार आहे. तरी ही मला न्याय न मिळाल्यास उमरी पंचायत समिती समोर अमरण उपोषण बसण्याचा इशारा स्वाभीमानी ब्रिगेड या सामाजीक संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश सैदमवार यांनी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी उमरी तहसीलदार गटविकास उमरी यांना निवेदनाव्दारे दिला आहे